अर्थबोधपत्रिका

आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा

'अर्थ'बोध करून देणारे मासिक

INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY ★ LIBRARY ★
7/10/04

१ ● स्वागत

३ ● 'ब्रेटनवूडस्च्या जुळया बहिणीं'ची साठ वर्षे

८ ● नाणेनिधीः देशांना आजारी करणारे रुग्णालय

१३ ● रशिया व आफ्रिकेत जागतिक बँकेची अविचारी पाऊले

१६ ● जपानः खाद्यसंस्कृती (व आरोग्य) संकटात ?

२० ● टी.व्हीचे मुलांवर होणारे अनिष्ट परिणाम

२५ ● 'इस्लाम' अनुकूल इलेक्ट्रॉनिक्स उद्योग

२७ ● प्राणी विचार करतात का ?

२९ ● शांततेच्या पाऊलखुणा (भारतातील धर्मांतर्गत शांतता)

३१ ● जगाच्या पाठीवर....(क्रीडा)

३३ ● कालप्रवाहात......

३४ ● 'काल'चे 'आज'साठी

खंड ३ : अंक ७ ऑक्टोबर २००४

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

<u>वार्षिक वर्गणी १००/- रुपये</u>

(परदेशस्थ वाचकांसाठी $२०)

वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

<u>वर्गणीसाठी पत्ता</u> :

व्यवस्थापक,
अर्थबोधपत्रिका,
भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी, अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटल जवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२
: २५६५७२१०
फॅक्स : २५६५७६९७
ई-मेल : ispe@vsnl.com

अर्थबोधपत्रिका

खंड ३ (अंक ७) ऑक्टोबर २००४

संपादक - रमेश पानसे

संपादन साहाय्यक - राज्यश्री क्षीरसागर

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्यावर पाठवावेत, अशी आपणास विनंती आहे.

‘अर्थबोधपत्रिके’तील माहिती कशी?

जी सहज चाळता येईल अशी !

◆भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेचे ‘अर्थबोधपत्रिका’ हे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय विषयांवरील माहितीपूर्ण लेख देणारे प्रकाशन **वर्गणीदारांना दरमहा १० तारखेला पोस्टाने पाठविले जाते.** ◆मराठी वाचकांना विविध विषयांवर अभ्यासपूर्ण माहिती देणे आणि एखाद्या विषयाच्या सर्व बाजू निष्पक्षपणे व सोप्या शब्दांत देणे, हे या मासिकाचे उद्देश. ◆अनेक विषयांवरील सखोल माहिती व विश्लेषणात्मक लेख प्रसिद्ध करणारी जी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरची इंग्रजी भाषेतील नियतकालिके पुस्तके व इंटरनेटसारखी माध्यमे आहेत, व ज्यांतील माहिती एरवी मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी माहिती मराठी वाचकांपर्यंत पोचविण्याचा हा प्रयत्न. ◆अंकातील लेख आपण आपल्या नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **‘अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने’** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. ◆लेख प्रसिद्ध झाल्यावर संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.

जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.

स्वागत

'अर्थबोधपत्रिके'चा ऑक्टोबर २००४ चा हा अंक नेहमीची वैचारिक करमणूक करीलच, पण, त्याबरोबर मेंदूला काही वैचारिक झिणझिण्या आणण्याचेही काम करील असे वाटते.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँक या जागतिक स्तरावरच्या दोन वित्तीय संस्थांना यंदा २००४च्या जुलैमध्ये ६० वर्षे पूर्ण झाली. एखाद्या संस्थेच्या मूल्यांकनासाठी एवढा काळ पुरेसा आहे. या संस्थांच्या स्थापनेच्या काळातील आशावाद व त्यांच्याकडून अपेक्षित असलेली कार्ये यासंबंधीची प्रत्यक्ष परिस्थिती काय आहे, हे जाणून घेण्यासाठी या संस्थांच्या संबंधी अर्थबोधपत्रिकेत पहिले तीन लेख प्रसिद्ध करण्यात आले आहेत. वाचकांना हे अभ्यासपूर्ण व माहितीपूर्ण लेख आवडतील अशी आशा आहे.

टी.व्हीच्या उपयुक्ततेचा जरा गंभीरपणे विचार प्रत्येकच कुटुंबाने करावा, अशी वेळ आता आली आहे. टी.व्हीचे मानसिक, शारीरिक, बौद्धिक आक्रमण आपण थोपवू शकलो नाही तर, सामाजिक अशांततेचा उगम, कदाचित, आपल्याच घरांत होण्याची शक्यता गृहीत धरायला हवी, हे जाणवून देणारा लेख, वाचकांनी इतरांनाही आवर्जून वाचायला द्यावा. असाच दुसरा छोटासा पण, तेवढाच महत्त्वाचा लेख आहे, सर्वधर्मीय संस्थेने शांतता निर्मितीच्या प्रयत्नांना घातलेला हात.

थोडासा दूरान्वयाने, तरीही संबंधित, असा एक नवीनच विचारलेख - केशवसुतांच्या कवितांची आजची प्रस्तुतता सांगणारा लेख वाचकांना आवडेल असे वाटते.

या गंभीर विचारांमध्ये काही हलके- फुलके देण्याचा प्रयत्न आवर्जून करण्यात आला आहे. जपानमधील खाद्यसंस्कृतीतील बदल, इस्लाम धर्माचा औद्योगिक क्षेत्रात होणारा वापर आणि प्राण्यांच्या संशोधनातील नवे काही, या अंकात देण्यात आले आहे. जगाच्या पाठीवर, क्रीडा क्षेत्रातील घटनांचा उल्लेखही वाचकांचे मनोरंजन करील.

अर्थबोधपत्रिकेने नवविचारांचे तसेच वाचकांच्या प्रतिक्रियांचे नेहमीच 'स्वागत' केले आहे. पुढील अंकासाठीही हे 'स्वागत' आहेच. ■■

वाचकांचा प्रतिसाद

आपले सर्व अंक वाचनीय आहेत. बौद्धिक व विचाराला चालना देणारे आहेत. जागतिक पातळीवरील विविध क्षेत्रांत कायकाय घडामोडी होतात, संशोधन होते ते ग्रामीण भागात समजत नाही. स्थानिक दैनिक वर्तमानपत्रांत ते येत नाहीत.

एस.आर.पाटील, कसबा बीड -करवीर, कोल्हापूर

आपले अंक चांगले असतात. 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'चा अनुवाद काय ? आपण वर्गणीत पुढील दरांचा विचार करावा. त्यामुळे काही ग्राहक तरी काही वर्षांची वर्गणी एकदम पाठवतील. यांत सर्वंकष खर्चात बचत आहे. विचार कराल असे वाटते. एका वर्षाची वर्गणी १०० रुपये, दोन वर्षांची १९५ रुपये, तीन वर्षांची २९० रुपये, चार वर्षे ३८५ रुपये व पाच वर्षे ४८० रुपये.

ग.गो. फडके, दादर, मुंबई

संपादकांची टिप्पणी - आपण केलेली सूचना चांगलीच आहे. त्यानुसार अर्थबोधपत्रिकेची एक वर्षाची वर्गणी १०० रुपये, दोन वर्षांची (एकत्र पाठविल्यास) १८० रुपये, तीन वर्षांची (एकत्र) २६० रुपये व पाच वर्षांची (एकत्र) ४०० रुपये अशी करीत आहोत (पान ३६ पाहावे). संस्थेचे मराठी नाव भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी असे आहे. हा इंग्रजी नावाचा अनुवाद नव्हे.

मार्च २००४ चा अर्थबोधपत्रिकेचा अंक वाचला. चांगला आहे. त्यात पान क्रमांक १६ -१७ वर एम -१५ असा उल्लेख आहे. माझ्या मते तो एमआय -एस असा हवा. तसेच पान २६ वर बँकिंगचा उगम इंग्लंडमध्ये झाला असा उल्लेख आहे. तो इटलीमध्ये झाला. पान ३८ वर म्यानमार असा उल्लेख आहे. त्याचा उच्चार 'मिनमा' असा आहे. बर्मीज भाषा पालीपासून झाली म्हणून त्यात र'चा उच्चार नाही.

स.र.पोतनीस,पुणे.

संपादकांची टिप्पणी - आपण अंक मनापासून वाचलात व तत्परतेने आपले मत कळविलेत याबद्दल आभार. आपण म्हटल्याप्रमाणे आम्ही जेथून संदर्भ घेतला ते तपासून पाहिले; त्यात एमआय -५ असा उल्लेख आहे. आधुनिक बँकिंगचा उगम इटलीमध्ये झाला याचा संदर्भ आपण देऊ शकलात तर तशी दुरुस्ती करता येईल. 'म्यानमार'बाबत आपले म्हणणे बरोबर असावे.

आर्थिक

'ब्रेटनवूड्स्च्या जुळ्या बहिणीं'ची साठ वर्षांची वाटचाल

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (International Monetary Fund - IMF) आणि जागतिक बँक (World Bank म्हणजेच International Bank for Reconstruction and Development -IBRD) या जागतिक स्तरावरच्या दोन वित्तीय संस्थांना ('ब्रेटनवूड्स्च्या जुळ्या बहिणी') गेल्या जुलैमध्ये ६० वर्षे पूर्ण झाली. १७ जुलै १९४४ रोजी न्यू हँपशायरमधील ब्रेटनवूड्स् येथे झालेल्या परिषदेमध्ये या दोन्ही संस्थांच्या मसुद्यांवर (Articles of Agreement) चर्चा झाली होती. १९४५ मध्ये या मसुद्यांना मंजुरी मिळाली. नाणेनिधीच्या नियामक मंडळाची पहिली बैठक मार्च १९४६ मध्ये झाली आणि १ मार्च १९४७ पासून या निधीच्या कार्याला प्रत्यक्ष सुरूवात झाली.

थोडीशी पार्श्वभूमी

१९१४ते १९१८ च्या पहिल्या महायुद्धानंतरच्या काही काळात जगात सापेक्ष आर्थिक स्थैर्य होते खरे; पण १९२९ च्या महामंदीने हेही स्थैर्य संपुष्टात आणले. मंदीतून स्वत:ला सावरण्यासाठी काही राष्ट्रांनी त्यांच्या चलनांच्या विनिमय दरांमध्ये एकतर्फी आणि मोठे बदल केले. प्रत्युत्तरादाखल इतरही राष्ट्रांनी त्यांच्याही विनिमय दरांमध्ये असेच बदल केले. आणि मग त्यांच्यात विनिमय दरांमध्ये बदल करण्याची स्पर्धाच सुरू झाली. खरे तर, याला 'स्पर्धा' म्हणण्यापेक्षा, पहिल्या महायुद्धाच्या नंतरचे हे एक तसेच (किंवा त्यापेक्षाही भयंकर असे) 'आर्थिक युद्ध'च म्हणायला हवे. या आर्थिक युद्धामुळे जागतिक उत्पादन, जागतिक व्यापार, रोजगार, किंमती - या सर्वांनीच त्याच्या न्यूनतम पातळ्या गाठल्या. लाखो लोक बेकार झाले; त्यांच्या बचती तर आटल्याच, पण भविष्यकालीन आर्थिक संपन्नतेच्या त्यांच्या आशाही पार मावळल्या. जगाच्या आर्थिक इतिहासात 'न भूतो' अशी परिस्थिती निर्माण झाली. या अशा आर्थिक आवर्तातून बाहेर पडणे, ही एक तात्कालिक गरज होती.

यानंतर दुसऱ्या महायुद्धाच्या काळात ज्या राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थांची पडझड झाली होती, त्यांना त्यांच्या अर्थव्यवस्थांची पुनर्रचना (reconstruction)करायची होती; तसेच, याच काळात नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांनाही आपल्या अर्थव्यवस्थांचा

विकास (Development) करायचा होता. पुनर्रचना आणि विकास या दोन्ही प्रक्रिया दीर्घकालीन असल्यामुळे, अशा राष्ट्रांना दीर्घकालीन कर्जाऊ भांडवल उपलब्ध करून देणाऱ्या एका आंतरराष्ट्रीय बँकेचीही गरज होती.

या व्यापक पार्श्वभूमीवर, जगाच्या आर्थिक इतिहासात प्रथमच काही विचारवंत, अर्थतज्ज्ञ आणि सरकारी अधिकारी एकत्र आले. चलनांच्या संदर्भात एक सुव्यवस्था प्रस्थापित करणे, हा त्यांचा मुख्य उद्देश होता. त्यांच्यात ब्रेटनवूडस् येथे सलग तीन आठवडे वैचारिक मंथन झाले. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि आंतरराष्ट्रीय पुनर्रचना आणि विकास बँक म्हणजे जागतिक बँक या संस्था म्हणजे याच मंथनातून जन्माला आलेल्या दोन जुळ्या बहिणी. दोन आंतरराष्ट्रीय संस्था जन्माला येण्याइतपत ही परिषद यशस्वी होईल, अशी फारच थोड्या लोकांची अपेक्षा होती; पण ती जगाच्या आर्थिक इतिहासातील एक मैलाचा दगड होऊन बसली.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी

जागतिक मंदीमुळे आंतरराष्ट्रीय व्यापारात झालेली प्रचंड घट कमी करून त्याचा विस्तार करणे; तसेच, त्याची संतुलित वाढ करणे - हे त्या काळातले मोठे आव्हान होते. विभिन्न राष्ट्रांच्या चलनांच्या विनिमय दरांमध्ये शिस्त प्रस्थापित करून हे आव्हान पेलायचे, असे ठरविण्यात आले. कारण, जोपर्यंत विनिमय दरांमध्येच बेशिस्त आहे, तोपर्यंत जागतिक व्यापारात वाढ होणे शक्यच नव्हते. विनिमय दरांमधील अनावश्यक 'सैलपणा' टाळून त्याऐवजी 'लवचिकता' आणली आणि त्याबरोबर अनावश्यक 'ताठरता'ही टाळून आर्थिक 'स्थैर्य' प्रस्थापित केले तर जागतिक मंदीची क्लेशकारक पुनरावृत्ती टाळता येईल, असा या परिषदेच्या प्रवर्तकांचा विश्वास होता. नाणेनिधीसारख्या संस्थेमुळे चलनविषयक संकटांचे (Monetary Crises) तर निर्मूलन होईलच, पण पूर्ण रोजगाराला पोषक असणारे आर्थिक स्थैर्यही प्रस्थापित होईल, अशी त्यांची अटकळ होती. तसेच एका नव्या आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्याच्या पर्वाला प्रारंभ होईल, विभिन्न राष्ट्रांच्या दरम्यान नवी मैत्री, नवी जवळीक प्रस्थापित होईल, शांततापूर्ण सहअस्तित्व, सुरक्षितता, संपन्नता यांची अनुभूती येईल, असा एक अतिशय व्यापक आशावाद तेव्हा प्रकट केला गेला. मुख्य म्हणजे, विनिमय दरांमधील स्थैर्य आणि आर्थिक विकास या दोन स्वतंत्र प्रक्रिया नसून त्या परस्परपूरक आहेत, असे मत तेव्हा व्यक्त करण्यात आले. नाणेनिधीच्या मसुद्यात या संस्थेकडून दोन भूमिका अपेक्षित होत्याः (१) निधीच्या सभासद - राष्ट्रांना आंतरराष्ट्रीय आर्थिक वागणूकीची

संहिता देऊन, तिचा आदर राखला जाईल याची दक्षता घेणे आणि (२)सभासदराष्ट्रांना, त्यांच्या कायदेशीर आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांसाठी आवश्यक असणारे जादा चलन उपलब्ध करून देणारी एक संस्था म्हणून कार्य करणे. याशिवाय, सभासदांना एकमेकांशी सल्लामसलत करण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि विकसनशील राष्ट्रांना मार्गदर्शन करणारा, तांत्रिक सल्ला देणारा एक 'स्रोत'म्हणून कार्य करणे अशा इतरही अपेक्षा होत्या.

आज या घटनेला ६० वर्षे पूर्ण झाली आहेत. एखाद्या संस्थेच्या मूल्यांकनासाठी एवढा काळ पुरेसा आहे. आज मागे वळून पाहिले तर, वर उल्लेखिलेला व्यापक आशावाद आणि निधीकडून अपेक्षित असलेली कार्ये यांच्या बाबतीतली परिस्थिती कशी होती, कशी आहे या प्रश्नांचा शोध घेणे महत्त्वाचे ठरते.

विनिमय दरांमधील स्थैर्य, त्यातून जागतिक व्यापारात वाढ आणि आर्थिक स्थैर्य इत्यादी बाबतीत निधीला, त्याच्या स्थापनेच्या नंतरच्या लगतच्या काळात, यश मिळाले, हे मान्य करायला हवे. पण हे यश दीर्घकाळ टिकू शकले नाही, ही वस्तुस्थितीही तशीच मान्य करायला हवी. विशेषतः जागतिकीकरणाच्या व मुक्त व्यापाराच्या आजच्या काळात, अनेक विकसनशील राष्ट्रांमध्ये या संस्थेचे कार्य हे वादग्रस्त ठरले आहे. भांडवलशाही धोरणांनाच पुढे रेटणारी ही संस्था विकसनशील राष्ट्रांच्या अर्थकारणात, समाजकारणात नको इतका हस्तक्षेप करते अशी टीकाही तिच्यावर होते. म्हणूनच या संस्थेमध्ये निर्माण झालेल्या महत्त्वाच्या दोषांचा विचार करणे क्रमप्राप्त ठरतेः

(१) नाणेनिधीजवळ स्वतःचे १५० अब्ज डॉलर्सचे भांडवल आहे. त्यामुळे नाणेनिधी कर्जे द्यायला तयारच असतो. सभासद राष्ट्रेही कर्जे घ्यायला तयार असतात. म्हणूनच, काही टीकाकारांच्या मते, नाणेनिधीच्या केवळ अस्तित्वामुळे आंतरराष्ट्रीय कर्जांच्या समस्या वाढल्या आहेत. या संस्थेचे कर्जे देण्याचे कार्य बंद करायला हवे. (२) जगातल्या कर्जबाजारी राष्ट्रांना त्यांच्या अंतर्गत आर्थिक धोरणांसाठी नाणेनिधीची मंजूरी घ्यावी लागते. आणि हे केवळ नाणेनिधीनेच पुरविलेल्या पैशाच्या बाबतीत नाही; तर जागतिक बँक / पाश्चात्य राष्ट्रे जेव्हा त्यांचा पैसा देतात, तेव्हा त्यांनाही नाणेनिधीचेच 'प्रमाणपत्र' हवे असते. (३) नाणेनिधीवर मूलतत्त्ववाद्यांनी (भांडवलशाही समर्थकांनी) आपला कब्जा बसविला आहे. प्रत्येक आर्थिक समस्येला 'मुक्त व्यापार' हे एकमेव उत्तर आहे, यात त्याचे मूलतत्त्व दडलेले आहे. आंतरराष्ट्रीय आर्थिक वातावरण कसेही असले तरी नाणेनिधीचा सरधोपट सल्ला एकच असतो. - 'सरकारी खर्च कमी करा;

सार्वजनिक उपक्रमांचे खाजगीकरण करा; सर्व प्रकारची अनुदाने बंद करा; आंतरराष्ट्रीय वित्त (भांडवल) आणि कंपन्या यांच्यासाठी तुमच्या अर्थव्यवस्था खुल्या करा.' इत्यादी. राष्ट्रांच्या स्थानिक परिस्थितीचा विचार न करता, पुरेसे संशोधन न करता अशा गोष्टी सरसकट सर्वच राष्ट्रांवर चक्क लादल्या जातात. रशिया, अतिपूर्वेकडील राष्ट्रे ही याची उदाहरणे आहेत. अर्जेन्टिनासारख्या एकेकाळी संपन्न असणाऱ्या राष्ट्राला भीक मागायची वेळ नाणेनिधीमुळेच आली. (४) १९८० च्या दशकात, या संस्थेने, बाजार-यंत्रणेचा प्रसार करण्यासाठी, मदत मागणाऱ्या सर्वच राष्ट्रांना, त्यांच्या अर्थव्यवस्थांमध्ये 'रचनात्मक बदल' करण्याच्या अटीवरच मदत केली; त्यांना अन्नधान्यासारख्या अत्यावश्यक वस्तूंवरीलही अनुदाने कमी / बंद करायला लावली. शिक्षण, आरोग्य अशा महत्त्वाच्या सामाजिक सेवांवरचा सरकारी खर्चही कमी करण्यास भाग पाडले. शेवटी संयुक्त राष्ट्रसंघाच्या संघटनांना याची दखल घेऊन 'रचनात्मक बदल करा; पण त्याला मानवी चेहरा असू द्या,' असा सल्ला द्यावा लागला ! (५) 'आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्य' प्रस्थापित करण्याऐवजी केवळ पाश्चात्य राष्ट्रांच्याच आर्थिक हिताचे संरक्षण आणि संवर्धन, नाणेनिधीकडून केले जाते.

(६) नाणेनिधीजवळ असलेली सत्ता आणि त्या सत्तेचा झालेला गैरवापर म्हणजे जगातला एक मोठा आर्थिक घोटाळा (Scandal) म्हणायला हवा. (७) वसाहतवादाच्या काळात उघडपणे 'जबरदस्ती' होती; आता नाणेनिधीकडूनही तेच घडते आहे. त्याचे नाव मात्र 'सल्ला' असे आहे ! आर्थिक बाबतीत आपण 'आंतरराष्ट्रीय न्यायाधीश' आहोत, अशाच तोऱ्यात ही संस्था काम करीत असते. (८) नाणेनिधीच्या कार्यप्रणालीत 'राजकारणा'चा खूपच शिरकाव झाला आहे. त्यामुळे अंतिम रोकडदात्याची (Lender of the last resort) भूमिका सातत्याने बजावणे तिला अवघड होऊन बसले आहे. (९) नाणेनिधीचे वित्तीय प्रारूपही (financial structure) सदोष आहे; ते बदलणे आवश्यक आहे. अन्यथा, अनेक 'अर्जेन्टिना' जन्माला येतील, अशी टीका जगभरातून झाली आहे.

जागतिक बँक

मागे उल्लेखिल्याप्रमाणे, दुसऱ्या महायुद्धात पडझड झालेल्या अर्थव्यवस्थांची पुनर्रचना करण्यासाठी आणि नव्याने स्वातंत्र्य मिळालेल्या राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थांचा विकास करण्यासाठी दीर्घकालीन मदत देऊ शकेल, अशा आंतरराष्ट्रीय बँकेची गरज होती. जागतिक बँकेच्या स्वरूपात ही गरज भागवली गेली. ही बँक आंतरराष्ट्रीय

बाजारात रोखे विकून पैसा उभारते; किंवा, आंतरराष्ट्रीय भांडवल बाजारातून स्वतःच कर्जे घेते. आंतरराष्ट्रीय पातळीवर अतिशय महत्त्वाचा मानला जाणारा सर्वोत्कृष्ट दर्जा (AAA) बँकेला लाभलेला असून त्याचा फायदाही तिला याबाबतीत चांगलाच मिळतो. घेतलेले कर्ज अर्ध्या (०.५ टक्के) किंवा पाऊण (०.७५टक्के) टक्के जादा व्याज घेऊन गरजू राष्ट्रांना दिले जाते. आणि मिळालेल्या नफ्यातून दहा हजारपेक्षा अधिक असलेल्या कर्मचाऱ्यांची वेतने व इतर नैमित्तिक खर्च भागवला जातो. खरे म्हटले तर जागतिक बँक हा एक गट आहे. त्यात 'इंटरनॅशनल फायनान्स कॉर्पोरेशन', 'इंटरनॅशनल डेव्लपमेंट असोसिएशन', 'इंटरनॅशनल सेंटर फॉर द सेटलमेंट ऑफ इन्व्हेस्टमेंट डिस्प्युटस्' आणि 'मल्टिनॅशनल इन्व्हेस्टमेंट गॅरंटी एजन्सी' अशा चार संस्था आहेत.

जागतिक बँकेचे स्वतःचे स्वरूप देखील संमिश्र आणि गुंतागुंतीचे आहे. ती जशी आर्थिक मदत देणारी एक 'एजन्सी' आहे; तशी आर्थिक विकासासाठी दीर्घकालीन कर्जे देणारी ती एक 'बँक'ही आहे; तसेच सभासद -राष्ट्रांना तांत्रिक साहाय्य करणारे ते एक 'केंद्र'ही आहे. संकेतानुसार, आतापर्यंत या बँकेचा अध्यक्ष हा अमेरिकनच राहिला आहे.

दुसऱ्या महायुद्धात ज्या राष्ट्रांचे आर्थिक नुकसान झाले, त्या राष्ट्रांमधील प्रामुख्याने पायाभूत सेवांचेच अधिक नुकसान झाले. उदाहरणार्थ, रस्ते, धरणे, वीज - निर्मिती इ. नव्याने राजकीय स्वातंत्र्य मिळालेल्या राष्ट्रांनाही, भविष्यकालीन आर्थिक विकासाचा भक्कम पाया रचण्यासाठी अशाच सेवांची स्थापना आपापल्या राष्ट्रांमध्ये प्रथम करायची होती; म्हणजे स्थूलमानाने, जागतिक बँकेने ज्या राष्ट्रांना मदत करायची होती, त्यांच्या गरजा काहीशा समानच होत्या. म्हणूनच सुरूवातीला या बँकेच्या कार्याचे क्षेत्र प्रामुख्याने पायाभूत सेवांपुरतेच मर्यादित राहिले. आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या, आर्थिकदृष्ट्या मातब्बर असणाऱ्या या संस्थेने अनेक विकसनशील राष्ट्रांमध्ये पायाभूत प्रकल्प उभारून त्यांना आर्थिक झळाळी प्राप्त करून दिली. गेल्या वीस-पंचवीस वर्षांमध्ये मात्र बँकेच्या कर्जे देण्याच्या अग्रक्रमामध्ये बदल झाला आहे. आता पारंपरिक पायाभूत सेवांच्या प्रकल्पांबरोबरच, आरोग्य, शिक्षण, प्रशासन आणि स्त्रियांशी संबंधित असणारे प्रकल्प यांनाही बँक मदत करते. शिक्षण, आहार, वित्तीय -क्षेत्राचे नियंत्रण, एड्स् निवारण इ. बाबतीत बँकेकडून दिले जाणारे तांत्रिक साहाय्य तर जागतिक दर्जाचे आहे. थोडक्यात, राष्ट्रांच्या बदलत्या गरजांचे भान ठेवून बँकेनेही स्वतःच्या कार्यात अनुरूप बदल केले आहेत; आणि ते स्वागतार्हच आहे. *(पान क्रमांक ३५ वर पाहावे)*

आर्थिक

नाणेनिधी: देशांना आजारी करणारे रुग्णालय

'जागतिकीकरणाने गरीब देशांमधील नागरिकांसाठी काही केलेले नाही. जागतिक अर्थव्यवस्था स्थिर राहण्यासाठी किंवा पर्यावरणाचे नुकसान होऊ नये यासाठी देखील जागतिकीकरणाने काही केले नाही.'
-जोसेफ स्टिगलिट्झ.

जोसेफ स्टिगलिट्झ

वरील विधान जागतिकीकरणाच्या विरोधातील एखाद्या नेत्याने केले असते तर ती वेगळी गोष्ट होती. पण जोसेफ स्टिगलिट्झ यांचे हे विधान महत्त्वाचे ठरते कारण ते आंतरराष्ट्रीय पातळीवर ख्याती मिळविलेले अर्थतज्ज्ञ आहेत. त्यांना २००१ मध्ये अर्थशास्त्राचा नोबेल पुरस्कार मिळालेला आहे. जागतिक बँकेचे ते मुख्य अर्थतज्ज्ञ आणि क्लिंटन यांच्या आर्थिक सल्लागार मंडळाचे अध्यक्ष होते. जागतिक बँकेत काम करीत असताना त्यांना लक्षात आले की विकसनशील देशांवर जागतिकीकरणाचे वाईट परिणाम होत आहेत. मग अभ्यासांती त्यांची जी भूमिका तयार झाली, ती जागतिकीकरणाच्या पूर्णपणे विरोधात नसली तरी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक व्यापार संघटनेसारख्या संस्थांमध्ये सुधारणा करण्याबाबत मात्र ते आग्रही आहेत. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या संदर्भात, 'न्यू इंटरनॅशनॅलिस्ट पब्लिकेशन्स लिमिटेड' तर्फे त्यांची एक सविस्तर मुलाखत मार्च २००४ मध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे. या मुलाखतीतील ही काही निवडक प्रश्नोत्तरे.:

●आंतरराष्ट्रीय नाणेनिधी ही संस्था पाश्चात्य देशांचे हित डोळ्यांपुढे ठेवून कार्य करते, असा निष्कर्ष आपल्याला काढणे भाग पडले, असे विधान तुम्ही केले आहे, त्याबद्दल थोडे काही ....

▲नाणेनिधीच्या कार्याचे मी काळजीपूर्वक निरीक्षण केले आहे. पूर्व आशिया, लॅटिन अमेरिका, आफ्रिका आणि इतर काही देशांच्या अर्थव्यवस्थांच्या स्थित्यंतराच्या काळात नाणेनिधीने सातत्याने काही चुका केल्या. केवळ अपघाताने झालेल्या या चुका

नव्हत्या -अशा चुकाकंडे एक 'कार्यपद्धती' या दृष्टिकोणातून अभ्यासकांचे लक्ष जाते. हे लक्षात घेतले पाहिजे. या चुकांचे एक स्पष्टीकरण असे दिले जाऊ शकते की, तेव्हा नाणेनिधीच्या कामकाजाशी संबंधित व्यक्ती सक्षम नव्हत्या. पण हे बरोबर नाही कारण, नाणेनिधीसारख्या संस्था भरपूर पगार देतात व त्यांच्याकडे चांगली तज्ज्ञ माणसे असतात. मग तुम्ही असे म्हणू शकता की नाणेनिधीचे आर्थिक प्रतिमान (Economic Model) चुकीचे होते. नेमकी अशी प्रतिमाने नाणेनिधीने निवडली की ज्यांचे पर्यवसान, अगदी चुकीचे अंदाज, चुकीची धोरणे आणि अनिष्ट परिणाम यांच्यात झाले. मग नाणेनिधीने तीच प्रतिमाने का निवडली ? याची काही तार्किक सुसंगती लावता येते. नाणेनिधीची उद्दिष्टेच वेगळी होती. ज्या देशांमध्ये नाणेनिधीने कार्य केले तेथील गरिबी दूर करणे किंवा रोजगार वाढविणे ही त्यांची उद्दिष्टे नव्हती. मग त्यांना काय साधायचे होते आणि हे निर्णय कोणाचे होते ?

नाणेनिधीच्या रचनेकडे काळजीपूर्वक बघितले तर हे स्पष्ट होते की, व्हेटो म्हणजे नकाराधिकार वापरण्याचा अधिकार फक्त एकट्या अमेरिकेला आहे. इतर देशांचे प्रतिनिधी म्हणजे त्यांच्या सेंट्रल बँकेचे प्रमुख तसेच अर्थमंत्री असतात (खरे तर, उद्योजकांच्या वर्गाला आर्थिक स्थिरतेची सर्वाधिक गरज असूनही त्यांचे प्रतिनिधित्व येथे नाही) आणि आपले हित सांभाळून जगाकडे बघण्याचा त्यांचा एक विशिष्ट दृष्टिकोण असतो. धनकोला रक्कम परत मिळाली पाहिजे, एवढेच त्यांच्या लेखी असते. कर्जासंबंधीचे करार पाळण्यावर त्यांचा भर असतो, अशावेळेस मी सामाजिक कराराचे काय, असे विचारले की कोणाकडे उत्तर नसते. **(सामाजिक करार हा सरकार आणि नागरिक यांच्यामधील एक अलिखित करार आहे की ज्यात नागरिक, सरकारकडून नोकरी व सामाजिक सुरक्षाविषयक किमान काही अपेक्षा ठेवून असतात. आणि या सामाजिक न्यायाबाबत स्टिगलिट्झ आग्रही आहेत !)**

विनिमय दरातील चढ -उतार (दोन देशांच्या चलनातील फरक) हे देखील यासंदर्भात महत्त्वाचे असतात. विनिमय दर उतरता किंवा कमी असला तर धनको देशाची परतफेड होणे कठीण होते, आणि विनिमय दरात घसरण होऊ नये म्हणून व्याजाचे दर वाढविले तर ऋणको देशाला कर्ज व व्याज परत करणे कठीण होते. तेव्हा अशा प्रकारची आर्थिक प्रतिमाने यशस्वी होतीलच असे नाही.

●नाणेनिधीच्या मुक्त व्यापाराच्या तत्त्वासंबंधी तुम्ही वेगळेच मत व्यक्त केले आहे....

▲अशा प्रकारच्या काही वादग्रस्त विषयांबाबत मी संवेदनशील आहे कारण

अमेरिकेचे माजी अध्यक्ष बिल क्लिंटन यांच्या आर्थिक सल्लागार मंडळाचा मी अध्यक्ष होतो. या प्रशासकीय यंत्रणेच्याद्वारे आम्ही बाजारपेठेची भूमिका आणि सरकारची भूमिका यांच्यात समतोल साधण्याचा प्रयत्न करीत होतो. मुक्त व्यापाराचे समर्थन करणाऱ्या अर्थतज्ज्ञांचे म्हणणे असे होते की सामाजिक सुरक्षाविषयक व्यवहारांचे खाजगीकरण व्हावे. याचा अभ्यास केला तेव्हा असे लक्षात आले की, सार्वजनिक क्षेत्रातील यासंबंधीच्या व्यवहाराचा खर्च (transactional costs) बराच कमी आहे आणि त्याच्या तुलनेत खाजगीक्षेत्रातील हा खर्च जास्त आहे. याशिवाय खाजगीकरण केल्यानंतर चलनफुगवट्यांबाबतचे विमा संरक्षण मिळत नाही. तेव्हा सार्वजनिक क्षेत्रात एक सामाजिक सुरक्षा व्यवस्था असणे गरजेचे आहे. त्याबरोबर खाजगीक्षेत्रातील एखादी व्यवस्था उभी राहू शकली तर त्याला हरकत नाही. यासंदर्भात आमच्या मतानुसार संमिश्र व्यवस्था असणे गरजेचे आहे. पण यासंदर्भात नाणेनिधीने मात्र खाजगीकरणाला प्रोत्साहन दिले आणि अर्जेन्टिना व बोलिव्हियासारखी राष्ट्रे अडचणीत

विकसनशील देशांना सांगण्यात आले की यावर चर्चा होऊ शकत नाही. आता दुसरा मार्ग नाही. हा बौद्धिकदृष्ट्या अप्रामाणिकपणा होय. -नोबेल पुरस्कार विजेते स्टिगलिट्झ

आली. नाणेनिधीचे निर्णय वादग्रस्त असूनही विकसनशील देशांना असे सांगण्यात आले की, याशिवाय दुसरा मार्ग नाही. आणि यावर चर्चा होऊ शकत नाही. हे मला योग्य वाटले नाही. बौद्धिकतेला न पटणाऱ्या बाबी मान्य करणे हा अप्रामाणिकपणा ठरतो. यासंदर्भात नाणेनिधीचे आणखी एक उदाहरण देता येईल. शेअर बाजार खुला करण्यामुळेच काही वर्षांपूर्वी, पूर्व आशियातील काही देशांमध्ये आर्थिक अस्थिरता निर्माण झाली होती. नाणेनिधीचे अनेक निर्णय हे अभ्यासपूर्ण संशोधनांवर आधारित नसतात. जागतिक व्यवहारात, पाश्चात्य देशांच्या आर्थिक वाढीसाठी एखादी गोष्ट चांगली असली, तरी विकसनशील देशांमधील अर्थव्यवस्थेसाठी ती गोष्ट चांगली ठरेलच असे नाही. जगाची व विकसनशील देशांची अर्थव्यवस्था स्थिर ठेवण्याकडे नाणेनिधीचा कल असायला हवा. या संस्थेची स्थापना त्या उद्देशाने झाली आहे.

●नाणेनिधीच्या निर्णयांवर तुम्ही टीका केल्यानंतर काही पडसाद उमटले असतील.....

▲'आम्ही नेहमी असेच करतो, हीच बरोबर गोष्ट आहे,' अशीच त्यांची (नाणेनिधीची) प्रतिक्रिया होती. या घटनेनंतरही त्यांनी आत्मपरीक्षण केले नाही किंवा

अभ्यासपूर्ण संशोधनांची मदत घेतली नाही. आता अलीकडे मात्र अल्पसे बदल होताना दिसताहेत. नाणेनिधीचे प्रमुख अर्थतज्ज्ञ रोगोफ यांनी अलीकडेच असे म्हटले आहे की, शेअर बाजार जागतिक पातळीवर खुला करणे हे धोकादायक ठरू शकते. तेव्हाचे माझे म्हणणे बरोबर होते, असे त्यांनी स्पष्टपणे म्हटलेले नसले तरी, एवढा त्यांचा खुलासाही तेव्हा मी बरोबर असल्याचेच दर्शवितो. नाणेनिधीच्या संदर्भात मला एका गोष्टीचे वाईट वाटते ते असे की तिच्यासारख्या संस्था लोकशाहीतील एक यंत्रणा म्हणून अस्तित्वात आल्या आहेत; किंबहुना त्या तशा असायला हव्यात. असे असताना प्रत्यक्ष व्यवहारात मात्र ही संस्था लोकशाहीला महत्त्व देणारी नाही, असे घडणे हे योग्य नाही.

●लोकशाहीला महत्त्व देणाऱ्या संस्थेबद्दल आपण बोलतो आहोत आणि ही संस्था प्रत्यक्षात कोणालाच जबाबदार ठरत नाही. खाद्यान्नावरील अनुदान रद्द करणे किंवा आरोग्यावरील खर्चात कपात करणे, या नाणेनिधीच्या निर्णयांचा गरीब देशांतील नागरिकांवर फार गंभीर परिणाम होऊ शकतो; ते मृत्युमुखी पडू शकतात.

▲आणि हा केवळ तात्कालिक परिणाम नसतो, तर तो दीर्घकाल टिकणारा असतो. भावी पिढ्यांवरही परिणाम करणारा असतो. उदाहरणार्थ, थायलंडमध्ये एडस्‌चा प्रश्न गंभीर आहे. एडस्‌चा प्रसार रोखण्यासाठी तेथे मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करण्यात

नाणेनिधी हे देशांना आजारी करणारे रुग्णालय आहे.
- अर्थतज्ज्ञ जोसेफ स्टिगलिट्झ

येत असताना त्यांना मदत देणे बंद केले तर तो देश अडचणीत नाही का येणार ? इंडोनेशिया व थायलंडबाबत असे घडले तेव्हा त्यांनी लवकरात लवकर कर्जाची परतफेड केली व यापुढे नाणेनिधीच्या योजना नकोतच असे ठरविले.

नाणेनिधीचे नेहमी असे म्हणणे असते की, 'आर्थिक स्थिती वाईट असलेले देश म्हणजे आजारी देश आमच्याकडे येतात. अशा देशांना आपल्या अंदाजपत्रकाचे व्यवस्थापन नीटपणे जमलेले नसते; आणि चलनफुगवटा नियंत्रणात ठेवता आलेला नसतो म्हणून ते नाणेनिधीची मदत मागतात.' येथे गंमतीने एक उदाहरण सांगतो. माझे वडील नेहमी म्हणायचे की, 'मला हॉस्पिटलमध्ये जायचे नाही कारण तेथे लोकं मरतात.' नाणेनिधीचे म्हणणेही अशाच प्रकारचे आहे. खरे तर, नाणेनिधी हे हॉस्पिटल अशाच प्रकारचे आहे की, जेथे अगोदरच आजारी असणारे देश आणखी आजारी

पडतात. पूर्व आशिया, लॅटिन अमेरिका, रशिया आणि आफ्रिका या देशांबाबत असेच घडले आहे. आणि नाणेनिधीचे म्हणणे त्यांनी पूर्णपणे मान्य केले असते, तर ते आणखी आजारी पडले असते ! मलेशियाने नाणेनिधीचा सल्ला ऐकला नाही आणि तो देश कर्जाच्या चक्रात अडकला नाही. थायलंड आणि इंडोनेशियाने नाणेनिधीचे 'औषध' घेतले तर त्यांची स्थिती आणखीनच बिघडली. नाणेनिधीच्या कामकाजाची आणखीही एक पद्धत आहे. मदत घेणारा देश अमेरिकेच्या बाजूने आहे किंवा कसे हे देखील पाहिले जाते. संयुक्त राष्ट्रसंघात तुम्ही अमेरिकेच्या बाजूने असाल, तर तुम्हाला जास्त प्रमाणात मदत मिळते. अर्थात, ज्या देशांना जास्त मदत मिळाली, त्या देशांमध्ये लवकर सुधारणा झाली का ? याचे उत्तर मात्र 'नाही' असेच मिळते !

●आता जरा जागतिक बँकेकडे वळू या. नाणेनिधीपेक्षा ही संस्था अधिक गुंतागुंतीची व बहुआयामी आहे. तेथील आपल्या अनुभवाबद्दल काय सांगाल ?

▲जागतिक बँक ही नाणेनिधीच्या तुलनेने अधिक व्यापक कार्य करते. विकास होणे गरजेचे आहे आणि विकास ही देखील एक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे, हे जागतिक बँकेला माहिती आहे. तेथे अधिक खुलेपणाने विविध विषयांवर चर्चा होते. विविध पर्यायांचाही विचार केला जातो. पण तेथेही नाणेनिधीने सुचविलेले मार्ग संबंधित देशांनी स्वीकारावे असेच म्हटले जाते. हेच राजकारण नेमके व्हायला नको.

●सिएटल येथे जागतिक व्यापार संघटनेच्या विरोधात निदर्शने होऊन एक दबावगट त्यातून तयार झाला. या दबावगटाच्या प्रयत्नांमुळे सर्व आर्थिक घडामोडी संपुष्टात न येता त्यात सुधारणा व्हाव्यात, असे तुम्हाला वाटते ?

▲माझ्या मते खरी गरज नव्या संस्थेची आहे. पण नाणेनिधी व जागतिक बँकेकडून ज्या चुका झाल्या तशाच चुका या नव्या संस्थेकडून व्हायला नकोत, ही खबरदारी घ्यावी लागेल. माझ्या नव्या पुस्तकात मी असे म्हटले आहे की शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर अमेरिकेला सामाजिक न्यायाच्या पायावर नवी जागतिक अर्थव्यवस्था निर्माण करण्याची संधी होती. मात्र अमेरिकेने सुपरपॉवर होऊन स्वतःच्या आर्थिक हिताकडे अधिक लक्ष दिले. आता इराक युद्धानंतर जगाला एका गोष्टीची स्पष्ट जाणीव होते आहे की, जगावर एकाच देशाचे नव्हे तर बहुदेशीय नियंत्रण हवे. या पार्श्वभूमीवर नाणेनिधीसारख्या संस्थांच्या चुकांची दुरूस्ती करून बहुदेशीय नियंत्रणाकडे जाण्याचा मार्ग कदाचित सापडू शकेल.

■■

आर्थिक

रशिया व आफ्रिकेत जागतिक बँकेची अविचारी पाऊले

तत्कालीन सोव्हिएट रशियाचे विघटन झाल्यानंतर साम्यवाद मागे पडला आणि भांडवलशाहीच्या दिशेने काही देशांची वाटचाल सुरू झाली. आपल्या देशाची परिस्थिती सुधारावी व जागतिक घडामोडींमध्ये आपणही सहभागी व्हावे यासाठी, जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची मदत अनेक राष्ट्रे घेऊ लागली. रशियानेही अशी मदत घेतली होती. रशियात जागतिक बँकेने खाजगीकरणाचे धोरण पुढे आणले. आपली धोरणे राबविण्यासाठी जागतिक बँकेने काही सल्लागारांची नियुक्ती केली होती. पीटर ग्रिफिथ हे त्यातलेच एक सल्लागार होते. या प्रकारच्या कामांचा त्यांना ४० वर्षांचा अनुभव आहे. या कामातून जागतिक बँकेच्या संदर्भातील, १९८० च्या दशकातील त्यांचे इतरत्र प्रसिद्ध झालेले अनुभव 'न्यू इंटरनॅशनॅलिस्ट पब्लिकेशन्स'ने पुन्हा प्रसिद्ध केले आहेत.

"जागतिक बँकेने १९८० च्या दशकात मुक्त व्यापाराचा तोडगा सुचविला; आणि देशांचे विविध प्रश्न कोणते व कशाप्रकारचे आहेत, हे विचारात न घेताच तो आग्रहाने अनेक देशांच्या गळी उतरविण्याचा प्रयत्न केला. "खाजगीकरण करा, सरकारी नियंत्रणे आणि अनुदाने हटवा, बाजारपेठेच्या नियमांनुसार किंमती ठरू द्या, मुक्त व्यापाराला चालना द्या," असे जागतिक बँकेने म्हटले होते. आफ्रिकेत हे धोरण अवलंबिल्यानंतर तिथे जी अस्थिरता निर्माण झाली होती, त्या अनुभवावरून धडा न घेता तीच धोरणे आता रशियात राबविण्यात येणार होती. जागतिक बँकेच्या लिखित स्वरूपातील धोरणांबद्दल मी बोलत नसून प्रत्यक्षात जी धोरणे अवलंबिली जातात, त्याचा उल्लेख मी येथे करतो आहे. या धोरणांचा संबंध सल्लागारांशी व जागतिक बँकेची मदत घेणाऱ्या संस्थांशी येतो.

"जागतिक बँकेने जेव्हा पूर्व युरोपमध्ये आपले कार्य सुरू केले तेव्हा तेथील राष्ट्रांची परिस्थिती अडचणीची होती. आणि तिसऱ्या जगातील राष्ट्रांच्या अडचणी व प्रश्न ज्यांना माहिती नव्हते, त्या अधिकाऱ्यांच्या हाती काही महत्त्वाची कामे सोपविण्यात आली होती, हे सर्व मुद्दाम करण्यात आले होते. काही व्यक्ती, म्हणजे असे व्यापारी वा

उद्योजक होते की जे मंदीमुळे अडचणीत आले होते. त्यांच्याजवळ व्यापारी, औद्योगिक वा सल्ला देण्यासाठी आवश्यक असलेली कौशल्ये नव्हती आणि जागतिक बाजारपेठेचे नियम वा कार्यपद्धतीही त्यांना माहिती नव्हती. तरी मग त्यांना महत्त्वाची कामे का देण्यात आली ? तर एक म्हणजे, जागतिक बँकेला त्यांना द्यावा लागणारा मोबदला कमी होता. दुसरे म्हणजे, पूर्व युरोपमधील लोकांना भांडवलशाहीतील उद्योगातील लोकांनी आपल्याला सल्ला द्यावा असे वाटत होते. आणि तिसरे म्हणजे, पूर्व युरोपमधील देशांना आपल्या देशाचे प्रश्न आफ्रिकेतील प्रश्नांशी जुळणारे आहेत, असे म्हणणेही कमीपणाचे वाटत होते. युरोपमधील लोकांनी आपल्याला मदत करावी, आफ्रिकेत काम केलेल्या लोकांनी नव्हे, असे पूर्व युरोपमधील अनेकांना वाटत होते. त्यामुळे माझ्यासारख्या अनुभवी व्यक्तीलाही पूर्व युरोपमधील पदावर जाण्यासाठी आफ्रिकेतील अनुभवाचा उल्लेख टाळावा लागला असता.

"महत्त्वाच्या पदांवर अशी भरती म्हणजे धोरणांबाबत व त्यांच्या अंमलबजावणीबाबत अनभिज्ञता हे स्पष्टच होते. उदाहरणार्थ, मला असे लक्षात आले की, रशियातील एका प्रांतात अन्नधान्य जास्त प्रमाणात पिकूनही त्या प्रांताचे गव्हर्नर किंमती कमी ठेवण्यासाठी अन्नधान्याच्या निर्यातीवर बंदी घालत होते. मग कमी किंमतींतील तो माल स्वतःच विकत घेऊन स्वतःच्या नावे निर्यात करून मोठा नफा मिळवीत होते. ही घटना मला जागतिक बँकेच्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी लागली.

"त्याच सुमारास आफ्रिकेतील उदाहरणांवरून असे स्पष्ट झाले होते की, बाजारपेठ अतिशय विस्कळित झालेली असताना खाजगीकरण करणे चुकीचे ठरते. आणि विसर्जित झालेल्या सोव्हिएट युनियनमधील बाजारपेठ, मी कार्य केलेल्या इतर ३० देशांतील बाजारपेठांच्या तुलनेत तर फारच विस्कळित झालेली होती. खाजगीकरण होण्यापूर्वी तेथे अनुदाने, कर व इतर नियम, नियंत्रणे होती. हे सर्व हटविण्यात आले तेव्हा काही महिन्यांतच कच्च्या वा तयार मालाच्या किंमती वाढून दुप्पट झाल्या असत्या किंवा घटून निम्म्याही झाल्या असत्या आणि अनेक कंपन्या दिवाळखोरही झाल्या असत्या. खरे तर पहिल्या टप्प्यात अनुदाने, कर व संख्यात्मक नियंत्रण (कोटा) हे काढून टाकून मुक्त व्यापारासाठीचा पाया तयार करायचा; मग दुसऱ्या टप्प्यात खाजगीकरण आणून मुक्त व्यापाराचे धोरण राबवायचे. असे केले असते तर ते देशाची परिस्थिती सुधारण्यासाठी योग्य ठरले असते. पण रशियात तसे करण्यात आले नाही. बाजारपेठेची

स्थिती फारशी समाधानकारक नसताना व एकदम पहिल्याच टप्प्यात मुक्त व्यापाराकडे वाटचाल केल्याने तेथील औद्योगिक क्षेत्राचे नुकसान झाले. ब्रिटनमधील काही सल्लागार रशियात खाजगीकरणाचे धोरण राबविण्यासाठी अनुकूल नव्हते. मग असे जाणवू लागले की, अमेरिकेची धोरणे राबविण्यासाठीच आम्ही काम करीत आहोत.

"रशियातील अस्थिरतेच्या व गोंधळाच्या धोरणकर्त्यांनी किंमतींवर नियंत्रण ठेवले. परिणामी, तेथील बाजारपेठेत अनर्थ झाला आणि सरकारच्या अखत्यारीतील कंपन्यांचे आर्थिक नुकसान झाले. अर्थव्यवस्था डबघाईला आली आणि तिच्यावर समाजकंटकांचे नियंत्रण आले. शेतकऱ्यांची स्वतःची जमीन असल्याखेरीज त्यांना बँकेकडून कर्ज देता येणार नाही, असाही बँकेचा एक नियम होता. शिवाय शेतजमीन किती व कशी आहे ते मोजले जाईपर्यंत जमीनीची मालकी स्पष्ट होऊ शकत नव्हती. हजारो वर्षांपासून ज्यांच्याकडे जमीन आहे त्यांच्याकडे ती परंपरागत असल्यामुळे कागदपत्रे नव्हती. असे अनेक प्रश्न रशियात निर्माण होत गेले व त्यावर समाधानकारक उत्तरे शोधण्याऐवजी आणखी गोंधळ मात्र निर्माण झाला. काही नागरिकांनी माझ्याजवळ असे मत व्यक्त केले की हुकुमशहा स्टालिनच्या कारकीर्दीत जेवढे लोकं मृत्युमुखी पडले नाहीत,त्यापेक्षा जास्त नागरिक जागतिक बँकेच्या कामाच्या काळात मृत्यमुखी पडले.

आफ्रिकेत तर जागतिक बँकेच्या धोरणाचा कहरच झाला. सिएरा लिओन या देशाला जागतिक बँकेने दहा लाख डॉलर्सचे कर्ज दिले; तेव्हा विनिमय दर हा एका डॉलरला सात लिओन एवढा होता. त्यानुसार त्या देशाला सत्तर लाख लिओन एवढे कर्ज मिळाले. कर्ज देण्यासाठी आलेला बँकेचा कर्जव्यवस्थापन खर्च हा प्रत्येक लिओनमागे सात लिओन एवढा आला. त्यामुळे प्रत्यक्षात दहा लाख लिओन एवढीच कर्जरक्कम अदा करण्यात आली. जेव्हा कर्जाच्या परतफेडीची वेळ आली तेव्हा प्रत्यक्षात एक लाख लिओन इतकीच परतफेड होऊ शकली. शिवाय लिओनचा विनिमय दरही पूर्वीच्या दराच्या एक पंचमांश एवढा खाली येऊन बँकेला दहा लाख डॉलर्सच्या कर्जापैकी, व्याजासह, एक लाख लिओनसाठी फक्त ३८०० डॉलर्स परत मिळू शकले. हे कर्ज देणे बँकेला इतके महागात पडले की बँकेच्या एका अधिकाऱ्याने अशी टिप्पणी केली की, बँकेने कर्ज देण्यापेक्षा एवढे डॉलर्स मोटारीच्या खिडकीतून वाटले असते तरी चालले असते." जागतिक बँक व नाणेनिधी या संस्थांची मदत सर्वच देशांना सारखीच उपयोगी ठरू शकत नाही, हेच यावरून सिद्ध होते. ■■

सामाजिक

जपान: खाद्यसंस्कृती (व आरोग्य) संकटात ?

विसाव्या शतकाच्या अखेरच्या दोन तीन दशकांमध्ये जगात विविध क्षेत्रांत काही बदल घडून आले. आर्थिक -औद्योगिक -राजकीय, विज्ञान - तंत्रज्ञान, या क्षेत्रांप्रमाणे सामाजिक क्षेत्रांत व त्यातही कुटुंब व्यवस्थेत झालेले बदल महत्त्वाचे ठरले आहेत. सामाजिक घडामोडींमध्ये रस असणाऱ्या अभ्यासकांनी त्यांचा अभ्यासही केला आहे. जपानमध्ये, असाच एक अभ्यास केला आहे इवामुरा नोबुको यांनी. साहित्याचा विशेष अभ्यास केलेल्या इवामुरा नोबुको या 'असात्सु डीके' कंपनीत व्यवस्थापकीय गटाच्या प्रमुख असून 'चेंजिंग फॅमिलिज, चेंजिंग मील्सः फॅक्टस् दॅट डिमॉलिश कन्व्हेंशनल मार्केटिंग विजडम,' या पुस्तकाच्या लेखिका आहेत. जपानच्या खाद्यसंस्कृतीत झालेले बदल त्यांना कुटुंबव्यवस्थेच्या आणि म्हणून आरोग्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचे वाटले, म्हणून त्यांनी या विषयाचा अभ्यास करण्याचे ठरविले. हा अभ्यास जपानमधील असला तरी त्यातून उभे राहिलेले चित्र, प्रत्येकाला आपापल्या परिसरातही ताडून पाहता येईल.

१९९८ पासून त्यांचा संशोधकांचा एक गट यासंबंधीचे सर्वेक्षण करीत आहे. जपानमधील १९६० नंतर जन्म झालेल्या पिढीचे विचार यासंबंधी जाणून घेतले जात आहेत. पिढीचा बदल ठरविताना १९६० हे वर्ष निवडण्यात आले कारण, इवामुरा यांच्या मते ही पिढी व याआधीची पिढी यांच्यात मूल्ये, दृष्टिकोण व आचार-विचार अशा सर्वच बाबींमध्ये फरक आढळतो. यासाठी प्रश्नावली भरून घेणे, मग त्या कुटुंबाचा प्रत्यक्ष व्यवहार जाणून घेणे व या दोहोंच्या आधारे अभ्यासपूर्ण निष्कर्षाप्रत येणे, अशा तीन टप्प्यांत केलेल्या या सर्वेक्षणातून त्यांच्या समोर जपानच्या या पिढीचे आचार-विचार व खाद्यसंस्कृतीचे एक चित्र पुढे आले. जपानमधील खाद्यसंस्कृती व आरोग्य संकटात आल्याचे त्यांना जाणवले. ते त्यांनी शब्दबद्ध केले आहे.

सर्वेक्षणातून पुढे आलेला सर्वात महत्त्वाचा मुद्दा असा की, नागरिकांनी लिहिलेली उत्तरे व त्यासंबंधीची त्यांची प्रत्यक्षातील कृती यांत बरीच तफावत आहे. दरवर्षी ही तफावत वाढतेच आहे. प्रश्नावली भरून देणारी व्यक्ती जेवढी तरुण तेवढी ही तफावत

आणखीनच वाढत असल्याचेही त्यांना आढळले. (घरातल्या व्यक्तींच्या उदरभरणाची जबाबदारी जपानमध्येही स्त्रियांकडेच आहे, हे येथे नमूद करणे महत्त्वाचे !) म्हणजे सर्वेक्षणाची प्रश्नावली भरून देताना ज्या व्यक्ती आपण घरी तयार केलेल्या अन्नाला प्राधान्य देऊ, असे म्हणतात, त्या प्रत्यक्षात मात्र बाहेरून आणलेले तयार पदार्थ खातात किंवा जास्तवेळा बाहेर जेवायला जातात, असे लक्षात आले. पोषक आहारात भाज्यांचा समावेश लेखी उत्तरात करणाऱ्या व्यक्ती, दैनंदिन जीवनात कधीतरीच भाज्यांच्या तयारीसाठी वेळ काढतात. असा विरोधाभास का आढळतो, याचे उत्तरही प्रश्नावली भरून देणाऱ्यांनी दिले आहे. त्यांचे म्हणणे असे की, प्रश्नावलीतून त्यांचा दृष्टिकोण वा आदर्श मते व्यक्त होतात, व्यवहारात तसे घडतच असते असे नाही. इवामुरा यांनी असेही नमूद केले आहे की, अशा सर्वेक्षणांमधून शंभर टक्के खरे चित्र उभे राहीलच याची खात्री देता येत नाही, पण लोकांचा कल कसा बदलत जातोय, याचा अंदाज काही प्रमाणात घेणे शक्य आहे.

जपानच्या संस्कृतीत पूर्वी, घरच्या जेवणाला (विविध प्रकारचे अन्न विविध पद्धतींनी शिजविणे व खाणे) समाजमनात जे स्थान होते, ते स्थान आता राहिलेले नाही. अन्न, वस्त्र व निवारा या तीन जीवनावश्यक बाबींमध्ये अन्नाला शेवटचा क्रमांक मिळालेला आहे. अन्नपदार्थ स्वतः घरी शिजविणे हे कमी महत्त्वाचे आहे, असे आता अनेकांना वाटू लागले आहे. (स्त्रियांना आता पाककौशल्य हे महत्त्वाचे व आवश्यक वाटत नाही, अन्न शिजविणे हे त्यांच्या व त्यांच्या नवऱ्यांच्याही दृष्टीने गौण ठरते आहे. रोजच्या रोज स्वयंपाक करणे हे आता कटकटीचे वाटू लागले आहे !) जीवनाचा मुख्य आधार असलेल्या जेवणासाठी श्रम, वेळ व पैसा घालविणे लोकांना व्यर्थ वाटते आहे. खाण्यावर एवढा विचार का करायचा, असेही मत काहींनी व्यक्त केले आहे. यामुळे अनेक कुटुंबांचे आरोग्य धोक्यात येण्याची फार मोठी शक्यता निर्माण झाली आहे.

कारण, जपानमधील स्त्रिया सकाळी लवकर उठून नवऱ्याला व मुलांना नाश्ता व डबा देण्यास मानसिक व शारीरिकदृष्ट्या तयार नाहीत. आपल्याला रोजच सकाळी परंपरागत पद्धतीचा नाश्ता तयार करून देणे शक्य होत नाही, असे बहुतांश स्त्रियांचे म्हणणे आहे. आपल्याला नाश्ता करायला वेळ होत नाही, असे या स्त्रिया म्हणतात, याचा अर्थ सकाळी स्वच्छता, कपडे धुणे वा भांडी घासणे अशी काही कामे त्या करतात, असेही नाही. ज्या स्त्रिया नाश्ता तयार ठेवतात, त्या एकदम सोपा नाश्ता करतात. म्हणजे नवऱ्यासाठी एक कप कॉफी व मुलांसाठी पेस्ट्री किंवा तत्सम गोड

पदार्थ, राईस केक, बन व त्यात मांस, कधीतरी सूप असा. पूर्वी जपानमध्ये नाश्त्याचा मुख्य पदार्थ भात असायचा. त्याबरोबर मिसो सूप व मग चहा किंवा पाश्चिमात्य धर्तीचा नास्ता म्हणजे ब्रेड व कॉफी किंवा दूध. मुले सकाळी सुस्त असतात, त्यांच्या आवडीचा नाश्ता दिला तर ते पटकन खाऊन शाळेत जाण्यास तयार होतात. शाळेत देखील डबा त्यांच्या आवडीचा दिला तर ते खातात असे शाळेकडून सांगण्यात येते. त्यामुळे नाश्ता व डबा करताना पदार्थांची पौष्टिकता विचारात घेतली जातेच असे नाही. (मुलांना विविध पदार्थांच्या योग्यायोग्यतेबाबत समजावणे, त्यांच्या कलाने वा गोड बोलून त्यांना आरोग्यदायी चांगले पदार्थ खाऊ घालणे याला आता प्राधान्य देण्यात येत नाही !) प्रश्नावली भरून देताना या पदार्थांना नाश्त्यासाठी प्राधान्य दिले जाते असे कोणीच म्हटलेले नाही. मात्र प्रत्यक्षात परिस्थिती उलट आहे. नाश्त्यासाठी नूडल्स किंवा ओटमीलचे नाव आता क्वचितच घेतले जाते.

जेवण्याचीही परंपरा येथे बदलत चालली आहे. परंपरागत पद्धतीने जेवण तयार करण्यापेक्षा एखादा नाविन्यपूर्ण पदार्थ तयार करण्याकडे तरुण स्त्रियांचा कल आहे. कारण, त्यांना कुटुंबाकडून पसंतीची पावती चटकन मिळते व त्यांना स्वतःलाही परंपरागत जेवण तयार करण्यापेक्षा असा एखादाच पदार्थ करण्यास आवडते. जेवण्याच्या वेळेस जर कुटुंबाला एकत्र येऊन आनंदाने जेवण करायचे असेल तर सर्वांच्या आवडीचे पदार्थ टेबलवर असावे आणि असे वेगवेगळे तयार पदार्थ विकत घेणे हे सोपे आहे, म्हणूनही तयार पदार्थ विकत घेण्याकडे कल वाढतो आहे. गेल्या पाच - सहा वर्षांपूर्वी येथे साधारणतः करी -राईस हा जेवणाचा सोपा व लवकर होणारा पदार्थ समजला जात होता. अलीकडे मात्र या पदार्थाकडे स्पेशल नाविन्यपूर्ण प्रकार म्हणून बघितले जाते. येथील स्त्रिया करी राईस तयार करताना, भारतातील स्त्रियांच्याप्रमाणे विविध प्रकारच्या डाळी शिजवून, फोडणी करून विविध प्रकारचे मसाले घालून करी (आमटी) तयार करतात, तसे करीत नाहीत. तर, बाजारातून करीची तयार पाकिटे आणून त्यात पाणी घातले की झाले. तरीदेखील हा खास पदार्थ मानला जातो आहे !

एक महत्त्वाचे म्हणजे आरोग्याबद्दलची जागरूकता मात्र येथे वाढते आहे. त्यामुळे आपल्या कुटुंबाच्या आरोग्याचा विचार आपण करतो असे म्हणणाऱ्या स्त्रिया मात्र प्रत्यक्षात तेवढी कृती करतातच असे नाही. मग आरोग्य चांगले राहावे म्हणून विशिष्ट पूरक अन्नपदार्थ, व्हिटामिन्स, प्रोटीन्स यांचा विचार करण्यात येतो. त्यासाठी मुलांना बाजारात मिळणारे नाट्टो (विशिष्ट पद्धतीने तयार केलेले सोयाबीन्स) खायला

दिले जाते. पण प्रत्यक्षात मात्र त्याचा वापर हा भाजीला पर्याय म्हणून केला जातो. घरी ज्यावर फारशी काही प्रक्रिया करावी लागत नाही असे, आरोग्यदायक आणखी काही पदार्थ विकत आणून ते टेबलवर मांडले जातात. अशा पदार्थांमधून शरीराचे पोषण होईल असे समजून प्रत्यक्षात खऱ्या जेवणाचा दर्जा आणखी खालावतो, हे मात्र लक्षात घेतले जात नाही.

जपानमधील कुटुंबांच्या स्वयंपाक करण्याच्या पद्धती व त्यांच्या खाण्याच्या सवयी लक्षात घेतल्या तर असे जाणवले की १९६० नंतर जन्म झालेल्या पिढीचा यासंबंधी एक विशिष्ट दृष्टिकोण आहे. 'सहजपणे खा, खाण्यासाठी खूप कष्ट, तडतड करू नका, चिडू नका, आवडीचे समोर येईल असे पाहा व ते खा, आनंदी राहून खाणेही आनंदाने घ्या, परस्पर सान्निध्याचा आनंद लुटा, समोरच्या व्यक्तीबरोबर जुळवून घ्या,' असा सध्या जपानमधील कुटुंबाचा मंत्र आहे. त्यामुळे वेगवेगळे पदार्थ तयार करण्यासाठी खूप कष्ट घेणे योग्य नाही असाही विचार बळावू लागला आहे. मुलांना सकाळी भूक नसताना बळेबळे खायला घालणे, पौष्टिक असले तरी त्यांच्या नावडीचे खायला देणे याला फाटा दिला गेला आहे. शिवाय मुलांना काही पदार्थांची जबरदस्ती करून घरातील वातावरण बिघडविण्याचीही स्त्रियांची तयारी नाही. काही स्त्रिया तर नवरे घरी येण्याआधी मुलांचे जेवण उरकण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे मुलांच्या आवडीचे, वाढायला सोपे, कमी कष्टाचे अन्न खाण्याकडे कल वाढतो आहे.

जपानमधील खाण्याच्या संबंधातील व कौटुंबिक संबंधांमधील हे बदल समाजशास्त्रज्ञांना विचार करण्यास प्रवृत्त करीत आहेत. पूर्वी, मुलांची शारीरिक, मानसिक व वैचारिक जडण -घडण हा कुटुंबव्यवस्थेचा एक अविभाज्य घटक मानला जात होता. हे सहजपणे घडत होते. आता पालक व मुले यांच्यातील संबंध तसे राहिलेले नाहीत. कुटुंबव्यवस्थेचा दीर्घकालीन फायदा लक्षात न घेता केवळ तात्पुरत्या आनंदाच्या मागे जाणारे पालक, सध्या आपल्या घरात आपल्या मुलांना दैनंदिन जीवनव्यवहाराचे, शिस्तीचे, आरोग्याचे धडे मुलांना मिळावेत, असा विचार करताना आढळत नाहीत. म्हणजे सध्याच्या प्रेमळ व सुखी कुटुंबाच्या चित्राला कशामुळे व कधी धक्के बसतील ते सांगता येणार नाही, अशी स्थिती आहे.

एकंदरीत जपानमधील कौटुंबिकता व कौटुंबिक खाद्यसंस्कृती कोसळण्याच्या कड्यावर येऊन थांबली आहे.

(संदर्भ - जपान एको, एप्रिल २००४)

सामाजिक

टीव्हीचे मुलांवर होणारे अनिष्ट परिणाम

टेलिव्हिजन नव्याने जगात अवतरला तेव्हा, 'एक अतिशय प्रभावी असे शिक्षणाचे माध्यम' अशी त्याची प्रतिमा बनलेली, बनवलेली होती. अल्पकाल त्याचा त्या दिशेने वापर व्हावा, असा प्रयत्नही केला गेला. परंतु आता मात्र टीव्हीची ही मूळ प्रतिमा डागाळली गेली आहे. त्याकडे एक शिक्षणाचे साधन म्हणून कोणी पाहत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे, जाहिरातींचे झालेले टीव्हीवरचे अनावर असे आक्रमण. या जाहिरातींचा एकमेव हेतू, लोकांना युक्त-अयुक्त, चांगल्या-वाईट वस्तूंच्या उपभोगाची चटक लावणे. आणि त्यासाठी अधिकाधिक वेळ त्यांना टीव्हीसमोर जखडून ठेवणे; असे जखडून ठेवण्यासाठी करमणुकीचा आभास निर्माण करणारे लहान-मोठे कार्यक्रम त्यांच्यापुढे ठेवणे; आणि धारावाहिक मालिकांसारखे असे कार्यक्रम देणे की जेणेकरून लोक सवयीनेच ठराविक वेळी आणि ठराविक वेळ टीव्हीसमोर बसून राहतील. हेच टीव्हीचे कार्यक्षेत्र ठरून गेलेले आहे.

टीव्हीसमोर तासन्तास निरुद्योगी बसून राहणे याने विद्यार्थीवर्गाच्या शरीरांचा नि मनांचा ताबा टीव्हीने केव्हाच घेतला आहे. आता अनेक अभ्यास अनेक संशोधने खात्रीलायकरित्या असे सांगताहेत की, टीव्हीचे विद्यार्थ्यांवर होणारे अनारोग्यकारक परिणाम फार मोठे आहेत. वजन वाढणे, कोणत्याही गोष्टींवर मन केंद्रित करण्याचा कालावधी कमी होणे, वाचनक्षमतेवर नि कौशल्यांवर परिणाम होणे आणि विद्यार्थ्या - विद्यार्थ्यांमधील परस्पर संबंध कमी वा विकृत होणे, असे एक ना अनेक ठळक परिणाम पुढे आले आहेत.

अमेरिकेत झालेल्या अभ्यासांनी जे निष्कर्ष पुढे आणले आहेत ते, सर्वच ठिकाणच्या टीव्ही आणि विद्यार्थी नात्याला लागू पडताहेत. कारण, विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या काळातील शिक्षणसंबंधित शारीरिक नि मानसिक गरज सर्वत्र सारख्याच असतात आणि टीव्हीचे स्वरूपही जागतिकीकरण होऊन सर्व ठिकाणी सारखेच व्यापारी झाले आहे. टीव्ही पाहणारे विद्यार्थी सरासरीने रोज चार तास टीव्ही पाहतात आणि त्यामुळे वर्षभरात अक्षरशः हजारो जाहिराती त्यांच्याकडून पाहिल्या जातात. कसल्या असतात

या जाहिराती ? अधिकांश जाहिराती या बहुधा फास्टफूडच्या किंवा तत्सम खाद्यपदार्थांच्या असतात. ज्यांच्या उपभोगाने, उपभोक्त्यांकडून साखर -मीठ -स्निग्ध पदार्थांचे अतिरिक्त सेवन आपोआपच केले जाते. व्यायाम न होणाऱ्या शरीरप्रकृतीला हे घातकच ठरते. टीव्हीवरील जाहिराती नि कार्यक्रमात मनाच्या प्रकृतीला घातक ठरणारेही अनेक विषय असतात. विशेषतः टीव्हीचा मुख्य भर असतो तो हिंसक कृत्यांवर आणि विकृत लैंगिक बाबींवर. आणि या गोष्टी पाहण्यात मुले किती वेळ दवडतात ? आपले शालेय शिक्षण संपेपर्यंत जेवढा वेळ त्यांनी शाळेच्या वर्गात व्यतीत केलेला असतो, त्याच्या दुप्पट वेळ त्यांनी टीव्हीसमोर घालविलेला असतो.

श्रीमंत वर्गांतून आणि श्रीमंत देशांमधून आणखी एक वेगळाच प्रश्न दिसून आला आहे. ८ ते १६ वयोगटातील, साठ टक्के मुलामुलींच्या झोपण्याच्या खोलीतच टीव्ही असतो; आणि त्यामुळे तो कितीतरी अधिक वेळ पाहिला जातो. अगदी रोज आठ तास टीव्ही पाहणारीही मुले आहेत. श्रीमंतच नव्हे, आता उच्च मध्यमवर्गीय आणि क्वचित मध्यमवर्गीयांच्या घरीही एकापेक्षा अधिक टीव्ही असतात. बऱ्याचदा यांपैकी एक टीव्ही हा केवळ मुलांसाठीच असतो. अमेरिकेत तर जवळजवळ निम्म्या घरांमधून तीन किंवा त्याहूनही जास्त टीव्ही आहेत. कित्येकदा प्रत्येकाच्या बेडरूममध्ये स्वतंत्रपणे आणि अगदी थेट बाथरूम्स किंवा गराजमध्येही टीव्ही आढळतात. अशावेळी मुलांना टीव्हीपासून परावृत्त करणे हे अशक्यप्राय ठरते.

टीव्हीचे मुलांवर होणारे घातक परिणाम, अनेकजण मान्य करीत नसले तरी काही दीर्घकालीन अभ्यासांनी हे परिणाम स्पष्टपणे लोकांसमोर मांडलेले आहेत. काय काय आहेत हे परिणाम ?

एक म्हणजे, टीव्हीचा कार्यक्रम पाहणारे मूल टीव्हीसमोर अगदी स्वस्थ बसत असते. त्यावेळी (झोप सोडली तर) अगदी सर्वात कमी कॅलरीजचा वापर करीत असते. त्या मुलाची शारीरिक हालचालही, कमी प्रमाणात टीव्ही पाहणाऱ्यांपेक्षा खूप कमी असते. शिवाय, त्यांच्याकडून, मोठ्या प्रमाणावर, अनारोग्यकारक अन्न आणि पेयवस्तूंच्या जाहिराती पाहिल्या जातात. एवढेच नव्हे तर बाहेर खेळणाऱ्या मुलांपेक्षा या मुलांचे अशा पदार्थांचे सेवनही जास्त असते. याचा साहजिक परिणाम अनाठायी वजन वाढण्यावर होतो. १९६४ सालापासून आजपर्यंत वजन वाढून स्थूल झालेल्या मुलांची संख्या अमेरिकेत, पाच टक्क्यांवरून पंधरा टक्क्यांवर गेली आहे. 'द सेंटर्स फॉर डिसिज कंट्रोल अँड प्रिव्हेन्शन'चे डॉक्टर विल्यम डीझ यांनी तर असे म्हटले आहे की,

वजनवाढीवरचा सगळ्यात परिणामकारक उपाय म्हणजे टीव्ही पाहणे कमी करणे हाच होय.

दुसरे म्हणजे, टेलिव्हीजन हा एक क्रियाशून्य कार्यक्रम असतो. संपूर्ण शारीरिक हालचाल बंदच असते. टीव्हीसमोरचे हे सारे तास मुलांना, आपल्या कल्पनाशक्तीचा विकास करणे, स्वावलंबी बनणे, काहीतरी करून शिकणे किंवा समाजाशी सामंजस्य प्रस्थापित करणारा व्यवहार या साऱ्यांपासून वंचित ठेवतात. यासंदर्भातील अभ्यास असे सांगतात की, जी मुले आठवड्याचे दहा किंवा जास्त तास टीव्ही पाहतात, ती वाचनव्यवहारात कमी प्रतीची ठरतात; आणि एकूणच त्यांची शैक्षणिक कामगिरी कमी दर्जाची असते. दीर्घकालीन अभ्यासांनी त्यांची अनेक कारणे स्पष्ट केली आहेत.

सिएटल (अमेरिका) येथील मुलांच्या इस्पितळात २५०० मुलांचा एक अभ्यास करण्यात आलेला आहे. (तो एप्रिलच्या 'द जर्नल पेडिॲट्रिक्स'मध्ये प्रसिद्ध झाला आहे.) हा अभ्यास असे सांगतो की ज्या मुलांनी (१ ते ३ या वयांतील छोट्या बालकांनी) जास्त वेळ टीव्ही पाहिला तर पुढे म्हणजे वयाच्या सातव्या वर्षाच्या आसपास, त्यांचे कशावरही लक्ष केंद्रित करण्याच्या बाबतीत प्रश्न निर्माण होतात. दर दिवशी टीव्ही पाहण्याच्या प्रत्येकी एका तासाबरोबर त्यांच्या या संदर्भातील आजारात ('अटेंशन डेफिसिट हायपरॲक्टिव्हिटी डिसऑर्डर') दहा टक्क्यांनी वाढ होते. मग या मुलांना अभ्यासावर वा आपल्या कोणत्याही कामावर लक्ष केंद्रित करणे कठीण होते; विचारांचे संघटन करण्यात अडथळे येतात आणि त्यांचे वर्तनही अधिक भावनातिरेकी बनते.

जी लहान मुले दरदिवशी दोन किंवा अधिक तास टीव्हीसमोर घालवतात त्यांच्या मेंदूला सरळसरळ इजा पोहोचते असे मेंदूविषयीचे अभ्यास सांगतात. टीव्ही पाहण्याने मेंदूमधील विद्युतप्रवाहाची आंदोलने वाढून (याला तांत्रिक भाषेत 'हॅबिटस् ऑफ माईंड' असे म्हणतात) परिणामतः मुलांमध्ये आक्रमकता वाढते, सहनशक्तीची पातळी खालावते आणि अर्थातच कोणत्याही बाबींवर लक्ष केंद्रित करण्याचा सामान्य कालावधी कमी होत जातो. त्याचा आणखी एक परिणाम असा होतो की मेंदूच्या डाव्या भागांत जे भाषावृद्धीचे कार्य अशा विद्युतप्रवाहांनी व्हायचे असते ते पुरेसे होत नाही. 'टीव्हीच्या केवळ दोन मिनिटांचे लक्ष केंद्रित होण्याचे' जे परिमाण असते, त्याचीच पुढे मनाची सवय बनते. मुले उतावीळ बनतात. त्यामुळे कोणत्याही कामात आवश्यक असलेला खोलवरचा विचार ती करू शकत नाहीत, असे एक शैक्षणिक मानसशास्त्रज्ञ

डॉ. जेन हिली यांनी म्हटले आहे. त्यांचे हे विवेचन 'अमेरिकन ॲकेडमी ऑफ पेडिॲट्रिक्स'ने प्रसिद्ध केले आहे. त्यांनी आपल्या विवेचनात असेही म्हटले आहे की 'अटेन्शन डेफिसिट डिसऑर्डर' असलेल्या मुलांच्या ज्या पालकांनी मुलांना टीव्हीपासून परावृत्त केले त्यांच्यात बऱ्यापैकी सुधारणा दिसून आली.

आणखी एक संबंध अभ्यासांमधून सिद्ध झाला आहे. तो म्हणजे टीव्हीवरील हिंसक प्रसंगाचे अवलोकन आणि मुलांची आक्रमक वृत्ती नि वागणूक यांमध्ये असलेला संबंध. अलीकडे आलेल्या एका नव्या अभ्यासात असे आढळून आले की. ज्या ६७७ लहान मुलांच्या पालकांकडे चौकशी केली, त्यातल्या तीन चतुर्थांश पालकांनी कबूल केले की त्यांची मुले आठवड्यातून एकदा तरी हिंसक प्रसंग पाहत असतात. टीव्ही पाहण्याचे आणखीही काही परिणाम वेगवेगळ्या अभ्यासांमधून मांडण्यात आले आहेत. उदाहरणार्थ, टीव्ही पाहणाऱ्या मुलांची झोप विस्कळित असते आणि हीच मुले सिगारेटच्या व्यसनाला बळी पडण्याची शक्यता मोठी असते. सॅनडिॲगो (अमेरिका) येथील 'सेंटर फॉर चाईल्ड हेल्थ आऊटकम्स' यांनी केलेल्या अभ्यासाचा निष्कर्ष असा आहे की १० ते १५ वयोगटातील जी मुले रोज ५-६ तास किंवा जास्त वेळ टीव्ही प्रक्षेपण रोज पाहतात त्यांच्याबाबतीत, जे असे करीत नाहीत अशा विद्यार्थ्यांच्या सहा पट अधिक, धूम्रपान सुरू करण्याची शक्यता असते.

टीव्हीच्या 'दर्शना'चे मुलांवर होणारे शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक परिणाम घातक असूनही, दिवसेंदिवस याबाबतीत पालक हतबल होताहेत असे दिसून येते. मुलांना टीव्हीतले कोणते कार्यक्रम पाहू द्यावेत ? कोणते नकोच ? टीव्ही किती वेळ पाहावा ? टीव्ही पाहू नये असे मुलांना कसे सांगावे ? मुलांना टीव्हीपासून परावृत्त कसे करावे ? असे एक ना अनेक प्रश्न जागरूक पालकांना सातत्याने भेडसावताहेत. यांपैकी काही प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न, अमेरिकेतील 'अमेरिकन ॲकडमी ऑफ पेडिॲट्रिक्स' आणि वॉशिंग्टनमधील 'टीव्ही टर्न ऑफ नेटवर्क' या संस्थांनी केला आहे. त्यांच्या सूचना अशा आहेत:

सुरूवातीला टीव्ही पाहण्यावर मर्यादा घाला आणि त्याचे घरचे नियम ठरवा. मुलांनी किती वेळ टीव्ही पाहावा हे नक्की करा. (कुठल्याही परिस्थितीत तासा-दोन तासापेक्षा जास्त नक्कीच नाही !) मात्र मुलांना 'तुला आता टीव्ही पाहता येणार नाही' असे सांगण्यापेक्षा 'चला, आता आपण टीव्ही बंद करून जरा वेळ अमुक अमुक गोष्ट करू या,' असे सांगा. उदाहरणार्थ, 'चला आपण जरा सायकल फिरवू या, वाचू

या, खेळू या, मित्रांकडे खेळायला जाऊ या,' इत्यादी. टीव्हीचा उपयोग उत्तेजनासाठी बक्षीस म्हणून किंवा कशाची तरी शिक्षा म्हणून करू नका. कारण, त्याने काहीही परिणाम न होता, उलट, मुलांच्या मनात टीव्हीचे असलेले मूल्य -महत्त्व उगीचच वाढते. तुमच्या मुलांना जेवताना किंवा गृहपाठ करताना टीव्ही पाहू देऊनका. अगदीच त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा कार्यक्रम तुम्हाला वाटत असेल तर तो टेप करून ठेवा नि मुलांना फावल्या वेळात दाखवा.

पाळणाघरात मुलांना रमविण्यासाठी टीव्हीचा वापर करू नका. समजा तुम्हाला स्वयंपाक वगैरे करण्यासाठी मोकळा वेळ हवाच असेल तर टीव्ही पाहण्याची वेळ त्याच्याशी निगडित करा. किंबहुना, घरातील सर्व कामांमध्येच मुलांना तुमच्याबरोबर घ्या, म्हणजे, मुले त्यातच चांगली रमतील; टीव्हीची फारशी गरजच राहणार नाही.

मुलांचे टीव्ही पाहण्याचे वेळापत्रक ठरवताना, कार्यक्रमांचे प्राधान्य ठरवा, आणि त्यानुसार निवडक कार्यक्रम त्यांना पाहायला द्या. विशिष्ट कार्यक्रम संपताच टीव्ही बंद करा. किंवा असेही ठरवा की विशिष्टच वेळी विशिष्ट व्हिडिओ टेप्स त्यांना दाखवायच्या (म्हणजे टीव्हीची गरजच नाही !)

शक्यतो मुलांबरोबर तुम्ही टीव्ही पाहून, पाहिलेल्या कार्यक्रमाविषयी त्यांच्याशी चर्चा करा. त्यांच्या मनांवर हे ठसू द्या की टीव्हीमधील पात्रे आणि प्रसंग खरे नसतात. मुलांना कार्टून्सचे कार्यक्रम पाहू देऊनका. विशेषत: ज्यात हिंसात्मक किंवा विकृत लैंगिक प्रसंग असतात त्या कार्यक्रमांपासून दूर ठेवा. जर मुले व्यापारी जाहिराती पाहत असतील तर त्यांना समजावून सांगा की या जाहिराती, केवळ लोकांनी, त्यांना नको असलेल्या वस्तू खरेदी कराव्यात यासाठी जाहिराती भाग पाडत असतात.

खरं तर, तुम्ही स्वतःच टीव्ही पाहण्यावर मर्यादा घालून तुमच्या मुलांसमोर चांगले उदाहरण ठेवा. आठवड्यातील एक दिवस 'टीव्ही बंद दिन' म्हणूनही पाळायला सुरूवात करा. (अशा प्रकारच्या सूचनांसाठी www.cqcm.org / kidsfirst ही वेबसाईट पाहा !)

(संदर्भ - जेम्स ब्रॉडी यांचा 'टीव्हीज टोल ऑन यंग माईंडस् अँड बॉडीज' हा न्यूयॉर्क टाइम्समधील लेख - दिनांक ३ ऑगस्ट २००४)

■■

औद्योगिक

'इस्लाम' अनुकूल इलेक्ट्रॉनिक्स उद्योग

अलीकडे, ग्राहकोपयोगी उत्पादनांच्या क्षेत्रांत बरेच बदल होताहेत. ग्राहकांना विविध सेवा व उत्पादनांचा पुरेपूर लाभ घेता यावा यासाठी (म्हणजे आपल्याला मोठी बाजारपेठ उपलब्ध व्हावी म्हणून), विविध कंपन्या धडपड करीत आहेत. आपल्या सेवा व उत्पादनांच्या बाबतीत ग्राहकांच्या मागण्यांचा समावेश करण्याचाही प्रयत्न करीत आहेत; किंबहुना, आपल्याच कल्पनाविस्ताराने त्यांना विविध सोयी-सुविधाही उपलब्ध करून देत आहेत. इलेक्ट्रॉनिक्स उद्योगाने सध्या अशा प्रकारचे धोरण अवलंबिले आहे. मोबाईल फोन, घड्याळे व तत्सम आधुनिक उत्पादनांना नवीन बाजारपेठ उपलब्ध व्हावी म्हणून त्यांनी चक्क 'इस्लाम' धर्माचा आधार घेतला आहे.

इस्लामला मानणाऱ्या या नागरिकांसाठी दिवसातून पाच वेळा मक्कास्थित मशीदीच्या दिशेने तोंड करून नमाज पढणे, ही दैनंदिन व्यवहारातील एक महत्त्वाची बाब आहे. नेमकेपणाने मक्केची दिशा समजणे ही त्यांची गरज लक्षात घेऊन, दक्षिण कोरियातील एल.जी. इलेक्ट्रॉनिक्स या जगप्रसिद्ध कंपनीने आपल्या सेलफोनवर ही दिशा अचूकपणे दर्शविली जाईल, अशी सोय केली आहे. या कंपनीच्या G-5300 या प्रकारच्या सेलफोनमध्ये एक कंपास बसविण्यात आला आहे. काही स्थानिक माहिती त्यात भरल्यास नेमक्या कोणत्या दिशेने प्रार्थना करायची हे समजून येते. गेल्या वर्षी हा सेलफोन मध्य पूर्वेत (मध्य आशियात) मोठ्या प्रमाणावर खपल्याने या कंपनीने आता त्याचे आणखी सुधारित मॉडेल अलीकडेच बाजारपेठेत आणले आहे. तथापि, असे करणारी ही एकमेव कंपनी नाही.

दुबई येथील इल्कोन या कंपनीने i-800 असा सेलफोन बाजारात आणला असून तो देखील नमाज पढण्याची दिशा व पाच हजार वेगवेगळ्या शहरांमधील नमाजाच्या वेळा दर्शवितो. कोरियातील पेनमॅन कॉर्पोरेशनने एका छोट्या यंत्रात कुराणची अरेबिक व इंग्रजी भाषेतील डिजिटल आवृत्ती बाजारात आणली आहे. यात दिशादर्शक कंपासशिवाय २५० शहरांमधील प्रार्थनांच्या वेळांनुसार प्रार्थनांचे आवाहन करणारीही यंत्रणा आहे.

या कंपन्यांसाठी मध्य आशियात जसा संख्येने मोठा मुस्लिम ग्राहकवर्ग आहे तसा तो दक्षिण आशियात व इतरत्रही आहे. (खालील आलेख पाहावा) एल.जी.ने

<u>विविध देशांमधील मुस्लिम लोकसंख्या</u>



मुस्लिम लोकसंख्या कोटींमध्ये (संदर्भ -IslamicPopulation.com)

आपले आधुनिक मॉडेल अलीकडेच इंडोनेशियातील बाजारपेठेत आणले आहे. इल्कोन कंपनीने सिंगापूरमध्ये प्रवेश केला आहे. मलेशियातील एका कंपनीने एक घड्याळ तयार केले असून त्यातही नमाज पढण्याच्या वेळा बघता येतात.

या सर्व कंपन्यांना एक काळजी मात्र आवर्जून घ्यावी लागते; ती अशी की कुराण वा तत्सम बाबींच्या संदर्भातील अनुवाद वा उच्चारण हे योग्य असावे लागते. अनवधनाने मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्या जाऊ नयेत, याची काळजी त्यांना घ्यावी लागते. त्यामुळे अनेक कंपन्या, मुस्लिम समाजाच्या धर्मगुरूंच्या किंवा धार्मिक मंडळाची संमती घेऊनच आपले उत्पादन बाजारात आणण्याची खबरदारी घेतात. या उत्पादनांच्या जाहिराती करताना देखील स्थानिक नागरिकांच्या आवडी व तेथील आचार -विचार लक्षात घेऊन त्या केल्या जातात. असे असले तरी मुस्लिम समाज व त्यांचे धर्मगुरू नवनवीन तंत्रज्ञानाला विरोध मात्र करीत नाहीत. इंडोनेशियातील निवडणुकीत अशा आधुनिक उपकरणांचा उपयोग करण्यात आला होता. तर काही मुस्लिम धर्मगुरू टेक्स्ट मेसेजद्वारे संदेशाची देवाण-घेवाणही करतात. नागरिकांना व त्याबरोबरच इस्लाम धर्माला मदत करणारे तंत्रज्ञान आता मुस्लिम समाजात लोकप्रिय होत आहे.

(संदर्भ - फार ईस्टर्न इकॉनॉमिक रिव्ह्यू, ५ ऑगस्ट २००४) ■■

विज्ञान - संशोधन

प्राणी विचार करतात का ?

कुत्र्यांना बोललेले कसे समजते ? लहान मूल जसे शब्द शिकते तशा प्रकारे शब्द ऐकून ते लक्षात ठेवण्याचा प्रयत्न कुत्रे करतात का ? कावळ्यांना दोऱ्याचे हूक तयार करण्याची कला कशी अवगत करता आली ? एका राणीमाशीच्या नेतृत्वाखाली मधमाशा एकत्र कशा राहतात ? असे एक ना अनेक प्रश्न संशोधकांना पडले आणि त्या कुतूहलामधून प्राण्यांवरील संशोधन पुढे येऊन, तत्संबंधी पुस्तके प्रकाशित होऊ लागली. अशा पुस्तकांमध्ये डोनाल्ड ग्रिफिन यांचे 'ॲनिमल थिंकिंग' (हार्वर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, १९८४) मार्क हौसर यांचे 'वाईल्ड माईंडस्' (हेन्री होल्ट, २०००) यांचा समावेश होतो. यासंदर्भात अलीकडेच क्लाईव्ह वेन यांचे 'डू ॲनिमल्स थिंक' (प्रिन्स्टन युनिव्हर्सिटी प्रेस, २००४) हे पुस्तक प्रसिद्ध झाले आहे.

काही बाबतीत माणूस व प्राणी यांच्यात बरेच साम्य आढळते तर काही बाबतीत नाही, असे स्पष्ट करताना क्लाईव्ह वेन यांनी पुस्तकात दोन भाग एकत्र केले आहेत. प्राणीप्रेमी असणाऱ्या क्लाईव्ह वेन यांनी, पहिल्या भागात माणसांचा -प्राणी हक्कांना मानणाऱ्या व्यक्तींचा प्राण्यांबद्दलचा दृष्टिकोण, आणि दुसऱ्या भागात त्याचे समर्थन करणारी प्राण्यांची वागणूक याविषयीचे सविस्तर विवेचन केले आहे. प्राण्यांची संवेदनक्षमता, आपापसात संवाद साधण्याचे कौशल्य, मधमाशांमधील सहकारवृत्ती याबरोबरच कबुतरे, वटवाघळे व डॉलफिन्स यांच्या संबंधातील विविध मुद्दे त्यांनी वाचकांपुढे मांडले आहेत. डॉलफिन्स यांना आरशातील स्वप्रतिमा ओळखता येते, माकडांना माणसाची हुबेहूब नक्कल करता येते, माणसांनी दिलेल्या आज्ञा कळतात, अशा काही बाबींवरून मानवसमूहाशी असलेले साधर्म्य त्यांनी चांगल्या व सोप्या पद्धतीने सांगितले आहे. प्राण्यांच्या मेंदूत डोकावून बघण्याच्या माणसांच्या प्रयत्नांचाही त्यांनी उल्लेख केला आहे. माणूस व प्राणी यांच्यातील काही बाबतीतील साधर्म्य आता अनेकांना माहिती झाले असून कधीकधी याचा अतिरेकही करण्यात येतो, असे त्यांनी म्हटले आहे. विज्ञानातील विविध संशोधनांचा आधार घेऊन प्राणी हक्क चळवळीतील अनेक जण प्राण्यांचे हक्क या विषयात कार्य करीत आहेत. विशेषतः माकडाचा मेंदू

काही प्रमाणात माणसाच्या मेंदूप्रमाणे काम करतो, करू शकतो म्हणून माकडांना मानवाधिकारांसारखे 'प्राणीअधिकार' असावेत, असा विचार मांडणारा एक गट आहे. अर्थात, या गटाचे यासंदर्भातील संशोधन अद्याप चालू आहे. तथापि, प्राण्यांना हक्क असावेत, ही कल्पना मात्र वेन यांनी मान्य केलेली नाही.

अर्थात, वाचकांना या पुस्तकातून एवढे मात्र नक्की जाणवते की, माणसे व प्राणी यांच्यात साधर्म्य असो वा नसो, माणसाने प्राण्यांना महत्त्व देऊन त्यांचे रक्षण करायला पाहिजे.

गोगलगायींचे विष व मानवी मेंदूविषयक संशोधन

साधारणपणे गोगलगाय हा एक निरूपद्रवी व निरूपयोगी कीटक समजला जातो. 'गोगलगाय अन् पोटात पाय' या म्हणीपुरताच आपला गोगलगायीशी संबंध आला असावा. पण 'कोन स्नेल' या नावाने ओळखली जाणारी गोगलगाय अतिशय जहाल विष बाहेर टाकत असते व ते जहाल विष संशोधनकार्यात फार उपयुक्त ठरू शकते, असे आढळल्याने ते मिळविण्यासाठी संशोधकांची धडपड चालू आहे.

क्लार्कसन् युनिव्हर्सिटीमधील जीवरसायनशास्त्रज्ञ जोन पॉल बिन्हॅम हे सध्या गोगलगायींचे विष मिळविण्याच्या प्रयत्नात आहेत. या गोगलगायीने बाहेर टाकलेले थेंबभर विषही अतिशय जहाल असून त्याच्या संपर्कात आलेल्या किमान दहा लोकांना काही क्षणांमध्येच संपविण्याची शक्ती त्यात आहे. त्यामुळे अक्षरशः जिवावर उदार होऊनच त्यांना हे विष मिळवावे लागते. यासाठी बिन्हॅम यांनी कोन स्नेलच्या समोर एका टेस्टट्यूबच्या आधारे साधारणपणे तिच्याच आकाराचा एक मेलेला मासा चिमट्यात धरून नाचविला. टेस्टट्यूबच्या तोंडावर एक विशिष्ट पद्धतीने तयार केलेली निमुळती रबरी पिशवी बसविण्यात आली होती. काही क्षणांतच त्या गोगलगायीने आपल्या सोंडेद्वारे माशाला व पिशवीला दंश केला. त्यावेळी काही मायक्रोलिटर विष त्या पिशवीत जमा झाले. या गोगलगायीच्या विषामुळे तीस पेक्षा जास्त माणसे मृत्युमुखी पडली आहेत. तरीदेखील हे विष मिळविण्यासाठी बिन्हॅम यांनी प्रयत्न का केले, तर संशोधनासाठी. मेंदूविषयक संशोधनात एखादी बारीकशी पेशी कसे काम करते हे शोधण्यासाठी व मेंदूतील कोणत्या पेशींच्या कार्यामुळे माणसाला विविध प्रकारच्या वेदना जाणवितात अशा काही संशोधनात या विषाचा उपयोग होणार आहे. किंबहुना, असे संशोधन करण्यासाठी या गोगलगायींची शेती करण्याचा बिन्हॅम यांचा विचार आहे !

(संदर्भ -नेचर)

■■

शांततेच्या पाऊलखुणा

भारतातील धर्मांतर्गत शांतता आणि 'ग्लोबल पीस वर्क्स्'

जागतिक शांततेसाठी विविध धर्मांमध्ये शांतता व परस्पर सहकार्याचे वातावरण असायला हवे; म्हणून विविध धर्मांवर श्रद्धा असणाऱ्यांनी एकत्र येऊन शांतता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न केले पाहिजेत, असे लक्षात आल्याने १९८० पासून असा एक गट ('इंटरफेथ सर्व्हिस प्रोजेक्ट्स') जागतिक पातळीवर कार्यरत झाला. न्यूयॉर्कस्थित असलेल्या या गटातील काही व्यक्तींनी एकत्र येऊन २००३ मध्ये 'ग्लोबल पीस वर्क्स्'ची स्थापना केली. दिल्ली (भारत) आणि लंडन (युनायटेड किंगडम) येथे त्यांची कार्यालये आहेत.

एरिक वेन्झेल हे ख्रिश्चन धर्माचे अनुयायी आहेत. त्यांच्या पुढाकाराने 'ग्लोबल पीस वर्क्स्'ची स्थापना करण्यात आली. 'मानवता हा एक परिवार, या संकल्पनेचे सामाजिक परिणाम आणि संघटनात्मक विकास' या विषयात ते डॉक्टरेट करीत आहेत. खोरम ओमर मुस्लिम धर्मीय असून १९८० पासून ते या कामात सहभागी झाले आहेत. एरिक वेन्झेल यांच्याएवढाच पुढाकार खोरम ओमर यांनीही घेतला आहे. त्यांनी 'इंटरफेथ सर्व्हिस प्रोजेक्ट्स' अंतर्गत भारतात दिल्ली येथे आणि पूर्व युरोपमध्येही कार्य केले आहे. या दोघांशिवाय इतरही काही जण 'ग्लोबल पीस वर्क्स्'मध्ये आहेत. रवींद्र गॅल्हेना (बौद्ध धर्मीय) यांनी श्रीलंका, मलेशिया, थायलंड, नेपाळ व भारत येथे शांततेच्या प्रकल्पांमध्ये कार्य केले आहे. रेव्ह. ॲन इमर्सन (ख्रिश्चन धर्मीय) या महिलेने 'द हार्मनी प्रोजेक्ट'चे काम केले आहे. न्यूयॉर्कमध्ये एक सामाजिक व आध्यात्मिक केंद्र त्या वीस वर्षांपासून चालवीत आहेत. मजहर अहमद (इस्लाम धर्मीय, मुंबई) यांनी कौन्सिल ऑफ द पार्लमेंट ऑफ द वर्ल्ड रिलिजन्स येथे उपाध्यक्ष म्हणून काम केले आहे. डॉन प्लंकेट (बहाई), मॅसिमो ट्रॉम्बिन (मूळचे कॅथॉलिक पण आता स्वतःला सर्वधर्मीय म्हणवून घेतात) इत्यादी व्यक्ती 'ग्लोबल पीस वर्क्स्'मध्ये सहभागी झालेल्या आहेत.

भारतात सर्वधर्मीय नागरिक असल्याने 'ग्लोबल पीस वर्क्स्'ला येथे शांततेचे कार्य करणे हे गरजेचे पण आव्हानाचे वाटले. शिवाय, या कार्याला भारतात संवेदनशील ठरलेल्या हिंदू -मुस्लिम प्रश्नाची पार्श्वभूमी तयार होतीच. भारतातील 'चेतनालय' या संस्थेच्या सहकार्याने आणि खोरम ओमर यांच्या पुढाकाराने 'ग्लोबल पीस वर्क्स्' चे काम पूर्व दिल्ली येथील जनता मजदूर कॉलनीत सुरू झाले.

जन्ता कॉलनी ही तशी गरीब भारतीयांची वस्ती. सामाजिक अशांतता किंवा धार्मिक दंगली यांमध्ये साधारणतः जास्त नुकसान गरीब गटाचे होते, त्यांचे दैनंदिन व्यवहार कठीण होऊन बसतात. अशा वेळी, अल्पशिक्षण आणि फार तर पोट भरण्याइतपत पैसा असलेल्या या नागरिकांसाठी धार्मिक सलोखा महत्त्वाचा ठरतो. हे ओळखून धार्मिक सलोखा प्रस्थापित करतानाच आर्थिक व सामाजिक सुधारणा घडवून आणणे हे देखील तेथे महत्त्वाचे होते. त्यांची गरज ओळखून या दिशेने प्रयत्न सुरू झाले. मग 'चेतनालय' आणि 'ग्लोबल पीस वर्क्स्' यांच्या एकत्रित प्रयत्नांनी येथे सर्वधर्मीय नागरी केंद्र उभे राहिले. या इमारतीचा पाया सर्वधर्मीयांनी मिळून घातला हे विशेष. या इमारतीत लहान मुलांसाठी पाळणाघर, स्त्रियांसाठी शिवणकेंद्र आणि युवकांसाठी सल्लाकेंद्र असे उपक्रम सुरू करण्यात आले आहेत. बेरोजगारी व त्यातून निर्माण होणारी निराशा ही येथील युवकांना गुन्हेगारी जगताच्या व अंमली पदार्थांच्या आहारी नेण्यास कारणीभूत ठरते; हे लक्षात घेऊन, तसे होऊ नये यासाठी, युवकांसमोर विविध पर्याय उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न येथे करण्यात येत आहेत.

'चेतनालय' व 'ग्लोबल पीस वर्क्स्'चे हे काम अल्पावधीतच लोकप्रिय झाले आणि उत्तरेकडील मोठे वृत्तपत्र - 'दैनिक जागरण'ने, या कार्याला पहिल्या पानावर प्रसिद्धी दिली. याचा चांगला परिणाम असा झाला की, दिल्लीच्या स्थानिक राजकीय नेतृत्वालाही या कार्याची दखल घ्यावी लागली. नागरी समाज कार्यान्वित झाल्याने या भागात हळूहळू बदल होऊ लागले. स्वच्छता, आरोग्य आणि रोजगार या दुर्लक्षित बाबी येथे आता प्राधान्याच्या ठरू लागल्या आहेत. बाहेरच्या संघटना आपल्या वस्तीत चांगले काम करू शकतात, हे लक्षात आल्यानंतर तेथील नागरिकांमध्येही परस्पर सहकार्याची भावना वाढीस लागली आहे.

'इच्छा तेथे मार्ग' हे 'ग्लोबल पीस वर्क्स्'ने आपल्या कामातून दाखवून दिले आहे.

■■

(संदर्भ - इंटरनेट)

बुद्धीबळातील राणी

बुद्धीबळाच्या पटावर शत्रूपक्षाला नामोहरम करणारी आणि राजाचा उजवा हात म्हणून सर्वात महत्त्वाची असलेली सोंगटी म्हणजे राणी होय. पटाच्या मर्दानी साम्राज्यातील ही एकमेव स्त्री योद्धा ! हे जरा आश्चर्यकारकच आहे. कारण, बुद्धिबळाचा उगम भारतात झाला; (साधारणपणे इसवीसन ५०० च्या सुमारास) आणि तो पर्शिया व अरबस्तानात फार लवकर लोकप्रिय झाला. त्यावेळी आशियातील या भागांत दैनंदिन् व्यवहारातील वा राज्यकारभारातील महत्त्वाची पदे स्त्रिया भूषवीत नव्हत्या. मग या खेळात राणीला एवढे महत्त्व कसे मिळाले ? या प्रश्नाचा वेध घेण्याचा प्रयत्न मॅरिलिन यालोम या अमेरिकेतील विदुषीने 'बर्थ ऑफ द चेस क्वीन: अ हिस्टरी' या पुस्तकात केला आहे. पटावरील राणीचा संबंध त्यांनी व्यवहारातील राणीपदाशी लावला आहे. राजेशाहीच्या कालखंडात राण्यांना मानाचे स्थान मिळाले, तसेच काहीसे बुद्धिबळाच्या बाबतीत घडले असावे, असे त्यांनी काही उदाहरणांवरून म्हटले आहे.

पूर्वी या खेळात राजाचा उजवा हात हा वजीर म्हणजे अमात्य किंवा राजाचा प्रधानमंत्री (राणी या सोंगटीऐवजी) समजला जात होता आणि त्याचा पटावरील अधिकार वा शक्ती आजच्या राणीएवढी नव्हती. मुस्लिम जगात आजही वजीरच मान्यताप्राप्त आहे. (रजिया सुलताना ही एकमेव राणी वीरांगना म्हणून इतिहासात प्रसिद्ध झाली आहे.) इसवीसन १००० च्या सुमारास वजीराऐवजी राणीने खेळात प्रवेश केला. त्यानंतर अंदाजे चारशे-पाचशे वर्षांनी राणीची पटावरील शक्ती वाढली. तिला आता पटावर कुठेही नि कसाही संचार करता येऊ लागला होता. त्यामुळेच शत्रूला नामोहरम करण्यात ती महत्त्वाची भूमिका बजावू लागली होती. मध्ययुगीन कालात, बुद्धिबळ हा खेळ युरोपमध्ये, प्रतिष्ठित कुटुंबामध्ये, स्त्री -पुरु ष अशा दोघांमध्येही लोकप्रिय झाला होता. मनोरंजनाचा एक चांगला मार्ग म्हणून त्याला ख्याती मिळाली होती. त्या काळात, साधारणपणे तेराव्या शतकात, 'द बुक ऑफ चेस' या पुस्तकाचे युरोपमधील अनेक भाषांमध्ये भाषांतरही झाले होते. मग पुनरुत्थानाच्या काळात राणीला पटावरून (व पटाबाहेरही) माघार घेणे भाग पडले.

इसवीसन १५३४ मध्ये एका फ्रेंच कवीने स्त्रियांचा अपमान करणारे शब्द बुद्धिबळाच्या चौसष्ठ घरांमध्ये लिहून संपूर्ण स्त्रीवर्गाचा अपमान केला होता. तरीही काही स्त्रिया बुद्धिबळात माघार घेत नव्हत्या. सतराव्या शतकातील कॅथरिन द मेदिसी सारख्या काही स्त्रियांनी बुद्धिबळातील आपला रस कायम ठेवला होता. त्यानंतर मात्र बुद्धिबळ व स्त्रिया हे नाते घट्टपणे जुळून आले नाही. विसाव्या शतकाअखेरीस केलेल्या एका सर्वेक्षणानुसार, जगात, बुद्धिबळ खेळणाऱ्या खेळाडूंमधे फक्त ५ टक्के स्त्रिया होत्या.

आता मॅरिलिन यालोम यांच्या निष्कर्षांचे काय करायचे ? त्या काळातही युरोपमध्ये ज्या काही राण्या वरचढ ठरल्या त्या वडील, पती किंवा पुत्र यांच्या सहकार्यानेच. गेल्या पाचशे वर्षांत मात्र बुद्धिबळात फारसे बदल झालेले नाहीत. आता एकविसाव्या शतकात बुद्धिबळात बदल करून सामाजिक व्यवहार आणायचा झाला तर.... तर बुद्धिबळात निम्मी फौज स्त्रियांची असावी लागेल, अगदी शिपायांपर्यंत !!

(संदर्भ - द इकॉनॉमिस्ट, १० जुलै २००४) ■■

(अ)प्रामाणिक खेळ ?

अथेन्समधील ऑलिम्पिक स्पर्धा संपल्या असल्या तरी या स्पर्धांच्या निमित्ताने पुन्हा एकदा जुनाच वाद उफाळला आणि तो म्हणजे खेळाडूंनी घेतलेल्या उत्तेजक द्रव्यांचा वा शक्तीवर्धक औषधे यांचा. यासंबंधी अनेक तज्ज्ञांची व खेळाडूंची वेगवेगळी मते आहेत. यावर तोडगा काढण्यासाठी आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीतर्फे १९९९ मध्ये 'वर्ल्ड अँटी डोपिंग एजन्सी'ची (WADA) स्थापना करण्यात आली. खेळाडूंनी औषधे घेतली आहेत किंवा कसे हे पाहण्यासाठी या एजन्सीने काही चाचण्या ठरवून दिल्या आहेत. पण त्यावरही बरेच वेगवेगळे मतप्रवाह आहेत. औषधे घ्यावीत किंवा नाहीत, कोणती औषधे आणि ती किती प्रमाणात घ्यावीत याचे निकष सर्वमान्य नाहीत. त्यामुळे दरवेळी एक नवाच वाद उद्भवतो. वैद्यकशास्त्र व औषधशास्त्र जेवढे प्रगत होत चालले आहे, तेवढेच हे प्रश्न आणखी वेगळे रूप धारण करताहेत. आता जीन थेरेपीचा यात वादात प्रवेश होण्याची चिन्हे आहेत. खेळाडूंनी औषधे घेतली तर ते चाचण्यांमधून स्पष्ट होऊ शकते. पण जीन थेरेपीचा उपयोग खेळाडूंनी करून घेतला तर ते शोधणे फारच कठीण होणार आहे. नैसर्गिक व प्रामाणिक खेळाचे दिवस संपत आले की काय, असे म्हणायची वेळ आली आहे. प्रगत विज्ञानाचे हे फ़ायदे म्हणायचे की तोटे ?

(संदर्भ - द इकॉनॉमिस्ट, ७ ऑगस्ट २००४) ■■

कालप्रवाहात..... जगाचा उपभोगखर्च

अलीकडच्या काळात, १९६० नंतर, जगाचा एकूण उपभोगखर्च मोठ्या प्रमाणावर वाढलेला दिसतो. १९६० च्या दशकात ४.८ ट्रिलियन अमेरिकन डॉलर्स एवढा असणारा उपभोगखर्च विसाव्या शतकाच्या अखेरीस, २००० मध्ये, २० ट्रिलियन अमेरिकन डॉलर्स एवढा वाढला. जगाची लोकसंख्या वाढल्याने खर्च वाढला, हे खरे असले तरी विविध देशांमधील नागरिकांची मिळकत वाढल्यानेही उपभोगखर्च जास्त प्रमाणात वाढला. श्रीमंत देशांमधील नागरिकांचा व गरीब देशामधील श्रीमंत नागरिकांचा खर्च हा प्रामुख्याने चैन -मौजेच्या बाबींवर झाला आहे. उदाहरणार्थ, भारतातील फास्ट - फूड उद्योग दरवर्षी ४० टक्के या वेगाने वाढत असूनही भारतातील एक -चतुर्थांश नागरिक हे कुपोषित आहेत. उपभोगखर्च वाढल्याने नैसर्गिक संसाधनांचा वापरही बराच वाढला आहे. १९६० ते १९९५ या काळात खनिज पदार्थांचा वापर अडीच पटीने, लाकडाचा वापर सव्वादोन पटीने आणि विविध धातूंचा वापर दुपटीने वाढला आहे. एकूणच जर जगाचा उपभोगखर्च कमी झाला, तर विविध देशांमधील नागरिकांच्या अत्यावश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध होऊ शकतो. काही विशिष्ट बाबींवरील प्रत्यक्ष खर्च व त्याच खर्चातून गाठली जाऊ शकतील अशी सामाजिक उद्दिष्टे यांचा विचार उदाहरणादाखल करण्यात आला आहे.

जसे की, सौंदर्यप्रसाधनांवरील जागतिक खर्च हा १८ बिलियन अमेरिकन डॉलर्स आहे. तो खर्च जर जागतिक पातळीवर स्त्रियांच्या आरोग्याची काळजी घेण्याकडे वळविण्यात आला तर १२ बिलियन डॉलर्स एवढा खर्च अपेक्षित आहे. अमेरिका व युरोप येथील पाळीव प्राण्यांच्या खाण्यावरील खर्च १७ बिलियन डॉलर्स आहे. जगातील मानवी कुपोषण व भूक हद्दपार करण्यासाठी अंदाजे १९ बिलियन डॉलर्स खर्च होतील.

अत्तरे, सुगंधी द्रव्ये यांवर होणारा जागतिक खर्च १५ बिलियन डॉलर्स आहे, तर सार्वत्रिक साक्षरतेचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी फक्त ५ बिलियन डॉलर्सचा खर्च येईल असा अंदाज आहे. युरोपमधील आईसक्रीमवरील खर्च १२ बिलियन डॉलर्स आहे, तर प्रत्येक लहान बालकाला लस टोचण्यासाठी १.३ बिलियन डॉलर्स एवढाच खर्च येईल अपेक्षित आहे. हा सारा प्रश्न प्राधान्यांचा आहे.

(संदर्भ - डाऊन टू अर्थ, ३० एप्रिल २००४). ■■

‘काल’चे ‘आज’साठी

[बरोबर शंभर वर्षांपूर्वी केशवसुतांनी आपल्या मोजक्या कवितांतून, काही गंभीर आणि खंबीर असा विचार त्यांच्या पिढीतील युवकांना दिला. (केशवसुतांचा कविताकाळ हा १८८५ ते १९०५ असा आहे.) आज आचार-विचारांत प्रतिगामित्वाची वावटळ आली आहे; तिला थोपविण्याचे धैर्य येण्यास केशवसुतांच्या अनेक पंक्ती आपल्या सर्वांना विशेषत: युवक-युवतींना उपयुक्त ठरतील.-संपादक]

भारतातील आजच्या परिस्थितीचा विचार करताना केशवसुतांची आठवण झाली. गो.वि (विंदा)करंदीकरांनी आपला ‘ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र’ हा ग्रंथ केशवसुतांना अर्पण केल्याचे आठवले !) आज भोवताली धार्मिक उत्सवाची गर्दी नि आकाशात ढग दाटून आले होते आणि मग ‘तुतारी’ कवितेतील (२८ मार्च १८९३ ला लिहिलेली ही कविता आहे) केशवसुतांच्या पुढील ओळी ओठावर आल्या.

अवडम्बरलीं ढगें कितीतरि;
रविकिरणांचा चूर होतसे,
मोहर सगला गळुनि जातसे,
कीड पिकांवरि सर्वत्र दिसे;
गाफीलगिरी तरिहि जगावरि !

डॉ. सुधीर रसाळ यांच्या ‘कविता आणि प्रतिमा’ या ग्रंथात या ओळी काही वेगळ्या संदर्भात उदाहरण म्हणून आल्या आहेत. परंतु तेथे त्यांनी, या ओळींचा अर्थ आणि आशय सांगितला आहे. तोच येथे उद्धृत करीत आहे.

अर्थ असा की, “केशवसुतांच्या उपर्युक्त ओळी जेव्हा आपण वाचू लागतो तेव्हा एका विशिष्ट दृष्याचे चित्र आपल्या मनात हळूहळू साकार होऊ लागते. पौष-माघ महिन्यातील निसर्गाचे हे चित्र आहे. सूर्यकिरणांमुळे या महिन्यातील वातावरण प्रसन्न बनून गेलेले असते. पिके उभी असतात, आंब्यासारख्या झाडांना मोहर आलेला असतो. एखाद्या वेळी अचानक ढग दाटून येतात (पण पाऊस पडत नाही). सूर्याची किरणे लुप्त होतात. मोहर गळू लागतो. ढगांमुळे पीक किड्यांच्या भक्ष्यस्थानी पडू लागते. या काळातले हे प्रसन्न वातावरण विनाशाच्या सावटाने उदास होऊन जाते.टट

आशय असा की, आपल्या समाजात अशा कितीतरी रूढी (ढग) निर्माण झाल्या आहेत की ज्यांमुळे आपल्या समाजात जे श्रेयस्कर, चांगले (रविकिरण) आहे ते नष्ट होत आहे. ज्या गोष्टींपासून (मोहर) आपणास भावी काळात चांगली फळे मिळणार आहेत त्या गोष्टीही नाहीशा होत आहेत. त्याचप्रमाणे समाजामध्ये ज्या काही फलदायी गोष्टी (पिके अस्तित्वात आहेत) त्याही यामुळे हळूहळू नष्ट होऊ लागल्या आहेत.

आपल्या समाजाची अशी अवनती होत असतानाही आपला समाज मात्र गाफील राहिला आहे.

या पुढील कडव्याचा अर्थ नि आशय वाचकांनीच लावावा, मनांत रुजवावा. ते कडवे असे आहे :

चमत्कार ! तें पुराण तेथुनि,
सुन्दर सोज्वळ गोडें मोठें,
अलिकडलें तें सगळें खोटें,
म्हणती धरूनी ढेरीं पोटें !
थु : त्यांच्यावर ! जोडे हाणुनि !

लोककवी मनमोहन यांनी केशवसुतांविषयी आपल्या कवितेत म्हटले आहे, "**शंभर** वर्षांनंतरही त्यांचा जन्म सरला नाही." हे खरेच तर !

(पान क्रमांक ७ वरून)

पण, नाणेनिधीप्रमाणेच, या बँकेतही दोष आहेतच; आणि त्यामुळे बँकेला तिची क्षमता पूर्णपणे वापरता येत नाही. विशेषतः बँकेची वित्तीय रचना अजूनही सदोष आहेः शंभर अब्ज डॉलर्सची कर्जे देणाऱ्या या बँकेला आंतरराष्ट्रीय भांडवल बाजारातून कर्जे घ्यावी लागतात. दुसरे असे की, राष्ट्रांनी बँकेकडून घेतलेली कर्जे त्यांना परत करता आली नाहीत; आणि तरीही बँकेचे कर्जे देण्याचे काम मात्र अव्याहतपणे चालू राहिले. गेल्या काही वर्षांमध्ये बँकेने दिलेली कर्जे साचतच गेली. म्हणूनच या बँकेनेही तिची कर्जे देण्याची खिडकी बंद करावी असा सल्ला दिला जातो. आणखी असे की, कर्जे घेतलेल्या राष्ट्रांच्या आर्थिक कामगिरीचे मूल्यमापन करण्याच्या बँकेच्या पद्धती जुन्या आहेत. मूल्यांकनाचे नवे निकष तिने शोधले पाहिजेत; तसेच, पुरवलेल्या सेवांचे योग्य मूल्यही तिने आकारले पाहिजे.

थोडक्यात, साठ वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या या संस्था, पूर्वीइतक्या स्वच्छ राहिलेल्या नाहीत. काही मूलभूत स्वरूपाचे दोष, राजकारण, 'हम करे सो कायदा' प्रवृत्ती, पाश्चात्यांच्या हिताची जपणूक आणि त्याचवेळी विकसनशील राष्ट्रांची पद्धतशीर गळचेपी इ. दोष या दोन्ही संस्थांमध्ये खूप खोलवर रुजले आहेत; ते दूर केल्यास त्यांची उपयुक्तता आजही वाटेल. अन्यथा या दोन्ही संस्था (जुळया बहिणी) जगाला नकोशाही वाटू लागतील. *(संदर्भ - द इकॉनॉमिस्ट २४ जुलै २००४, इंटरनेट, एन्सायक्लोपेडिया ऑफ इकॉनॉमिक्स, द इव्होल्यूशन ऑफ द इंटरनॅशनल मॉनिटरी सिस्टिम - १९४५-८८, ब्रेटनवूड्स् - बर्थ ऑफ अ मॉनिटरी सिस्टिम)* ■■

अर्थबोधपत्रिका वर्गणीदारांसाठी विशेष योजना

१५ ऑक्टोबर २००४ पासून वार्षिक वर्गणी फक्त १००/ - रुपये

द्वैवार्षिक वर्गणी एकत्र पाठविल्यास फक्त १८०/ - रुपये

त्रैवार्षिक वर्गणी एकत्र पाठविल्यास फक्त २६०/ - रुपये व एक पुस्तिका भेट

पंचवार्षिक वर्गणी एकत्र पाठविल्यास फक्त ४००/- रुपये व दोन पुस्तिका भेट

पुस्तिका - (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न, लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत तीस रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण, (इंग्रजी पुस्तिका) लेखक - जयकुमार अनगोळ (किंमत तीस रुपये) (३) सक्तीचे प्राथमिक शिक्षण, (मराठी पुस्तिका) लेखक - जयकुमार अनगोळ, अनुवाद - प्रा. रमेश पानसे (किंमत तीस रुपये) (४) शोध घेते ते शिक्षण, लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत - पन्नास रुपये) (५) गव्हर्नन्स, सुपरव्हिजन अँड मार्केट डिसिप्लिन : लेसन्स फ्रॉम एनरॉन (इंग्रजी पुस्तिका) लेखक - जयंत वर्मा (किंमत शंभर रुपये)

महिलांचे (सार्वजनिक) क्षेत्र

स्त्रियांनी नोकरी करावी की नाही? हा मूलभूत प्रश्न मागे पडून आज स्त्रीने अनेक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले. आता परिस्थिती अशी आहे की, सार्वजनिक क्षेत्रात स्त्रियांनी पुरुषांना केव्हाच मागे टाकले आहे. इतरवेळी अत्यंत धीम्या गतीने प्रगती करणाऱ्या सार्वजनिक क्षेत्रात ही सुप्त क्रांतीच म्हणायला हवी. सरकारच्या उपलब्ध आकडेवारीनुसार सार्वजनिक क्षेत्रात, गेल्या दहा वर्षांत, पुरुषांचे प्रमाण सहा लाखांनी कमी झाले आणि तितक्याच संख्येने महिलांचे प्रमाण वाढले. टक्केवारीच्या भाषेत बोलायचं तर पुरुष नोकरदारांचे प्रमाण ५ टक्क्यांनी घटले तर महिलांचं प्रमाण ३० टक्क्यांनी वाढले. थोडक्यात, सार्वजनिक क्षेत्रातील नोकरदारांचं प्रमाण मात्र तेवढंच राहिलं आहे.

सार्वजनिक क्षेत्रातील या बदलाला अनेक कारणे आहेत. नोकरीपेक्षा व्यवसायाला प्राध्यान्य देण्याच्या या काळात पुरुषांनी स्वेच्छानिवृत्तीचा पर्याय निवडून व्यवसायात उडी घेतली. याउलट महिलांना या क्षेत्रातच अनेक सेवासंधी उपलब्ध झाल्या. आज उद्योग क्षेत्रासह सार्वजनिक क्षेत्र अधिकाधिक ग्राहकाभिमुख आणि सेवाभिमुख होत आहे. ग्राहकाची काळजी, सेवा, व्यवसायाचा भाग म्हणून त्यांच्याशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित करणे, जनमानसात संस्थेची योग्य प्रतिमा उभी करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणे, अशा प्रकारची कामे त्या उत्तम रितीने करू शकतात. त्यांच्या कौशल्याला वाव मिळेल असे वातावरण असल्याने उच्चशिक्षित महिलांचा ओढाही दिवसेंदिवस इकडे वाढतो आहे. काही मनुष्यबळ विकास तज्ञ (HR Experts) या संधीचे श्रेय गेल्या दशकातील आर्थिक उदारीकरणाला देतात. ट्रान्ससर्च इंडियाचे व्यवस्थापकीय भागीदार उदय चावला म्हणतात की, सर्वसाधारणपणे पुरुष त्यांच्या करियरच्या बाबतीत धोके पत्करतात. म्हणूनच सुरक्षित नोकऱ्या सोडून स्वतंत्र व्यवसायाची वाट त्यांनी चोखाळली. त्यामुळे नवनवीन वाढीच्या क्षेत्रातही अनेक संधी निर्माण झाल्या.

नव्वद सालानंतर सार्वजनिक क्षेत्रात आर्थिक, विमा, स्थावर मालमत्ता इत्यादी उद्योगांमध्ये अनेक संधी उपलब्ध झाल्या. ही क्षेत्रे महिलांना काम करण्यास अत्यंत पूरक आहेत. संघटित क्षेत्रे बरीच लवचिक असल्याने प्रसुतीकाळ, मुलांचे संगोपन यांसारख्या कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडताना त्यांनाही काम करणे सोयीचे होते. थोडक्यात काय, सार्वजनिक क्षेत्रातील स्त्रियांची मक्तेदारी दिवसेंदिवस वाढतच आहे. संसदेत महिला आरक्षण विधेयकावरील चर्चेतून काही साध्य होण्यापूर्वीच महिलांनी या क्षेत्रात बराच मोठा पल्ला गाठला आहे. *(संदर्भ - इकॉनॉमिक टाइम्स)* ■■

RNI, Regn.No. MAHMAR/2002/9806
Declaration Ref. P.H.M./S.R./61/VIII/2003
Postal Regn.No.PR/RNP/PNW/M/231/2003-2006
L.W.P. LICENCE NO. L-502

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

स्थापना ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

उद्दिष्टे ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयाचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य / पत्रके / पुस्तिका योग्य नमुन्यांत तयार करुन प्रकाशित करणे.

उपक्रम ■संस्थेतर्फे १९८९सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■अलीकडे, संस्थेतर्फे सर्व सामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

- संस्थेचे नियंत्रण मंडळ -

•अजित कर्णिक •विकास चित्रे •कुमुदिनी दांडेकर
•ललित देशपांडे •द.ना. धनागरे •आनंद नाडकर्णी •रमेश पानसे
•मनोहर भिडे •नीळकंठ रथ •के. एन्. राज •व्ही.एम्.राव •ए.वैद्यनाथन
•सत्यरंजन साठे •रामदास होनावर •योगेंद्र यादव

इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : रमेश पानसे